रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक २३०

www.ramprahar.com

# राम प्रहर

शुक्रवार, ७ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## कर्नाळा बँक घोटाळा : विवेक पाटील यांची उच्च न्यायालयात माघार; मुक्काम तुरुंगातच!



**मुंबई** : कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या सुमारे ५४३ कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी अटकेत असलेले बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयात जामिनासाठी दाखल केलेला अर्ज गुरुवारी (दि. ६) मागे घेतला. या वेळी विवेक पाटील यांच्या वकिलांनी जामिनासाठी उपस्थित केलेले मुद्दे न्यायाधीश एन.आर. बोरकर यांनी खोडून काढले. त्यामुळे जामीन अर्ज फेटाळला जाईल या भीतीने विवेक पाटीलांनी माघार घेतली. यापूर्वी विवेक पाटील यांचा जामीन अर्ज पनवेलचे जिल्हा न्यायाधीश जयराज वडणे यांनी फेटाळला होता. त्याला ॲड. राहुल ठाकूर यांच्यामार्फत उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सुनावणीदरम्यान त्यांनी वैद्यकीय कारण, जप्त केलेली मालमत्ता घोटाळ्याच्या किमतीपेक्षा जास्त तसेच साडेतीन वर्षांपेक्षा जास्त काळ तुरूंगात असल्याने विवेक पाटील यांना जामीन मंजूर करावा, अशी विनंती केली. त्यावर बँकेचे खातेदार के.ए. म्हात्रे यांच्या वतीने ॲड. सौरभ बुटाला आणि ॲड. चेतन जाधव यांनी जोरदार युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायमूर्तींनी वैद्यकीय कारणास्तव तसेच विवेक पाटील यांच्या जप्त मालमत्तेची किंमत ही घोटाळ्यापेक्षा जास्त असली तरी गुन्ह्याचे गांभीर्य पाहता जामीन देता येणार नाही, असे स्पष्ट केले. त्यानंतर हे अपिल फेटाळण्यापूर्वी अर्ज मागे घेण्याची संधी देतो, असे सांगितले. त्यावर विवेक पाटील यांचा अर्ज वकिलांनी मागे घेतला. त्यामुळे पाटील यांचा मुक्काम तुरुंगातच असणार आहे.

# बाळगंगा धरणग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करणार

## मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांचे अधिवेशनात आश्वासन

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यातील बाळगंगा धरण प्रकल्पासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सकारात्मक बैठक झाली असून धरणग्रस्तांचे प्रश्न मार्गी लावण्याबरोबरच या धरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सभागृहात दिले.



आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

मुंबई येथे विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून बाळगंगा धरणग्रस्तांचे प्रश्न आणि हा प्रकल्प पूर्ण करण्यासंदर्भात पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील आणि पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी शासनाचे लक्ष वेधले.

सभागृहात बोलताना आमदार रविशेठ पाटील यांनी बाळगंगा धरणासाठी १५ वर्षांपूर्वी जमीन संपादित केल्याचे नमूद करत त्या जमीन क्षेत्रातील सहा ग्रामपंचायती, नऊ महसुली गावे, १३ आदिवासीवाड्या आणि त्या अनुषंगाने तीन हजार कुटूंब विस्थापित होत आहेत. ग्रामस्थांचा धरणाला विरोध नाही, परंतु त्यांचे सर्व प्रश्न मार्गी लागले पाहिजेत. अगोदर पुनर्वसन, मग धरण या कायद्याप्रमाणे शासनाने त्या ठिकाणी प्रक्रिया केली नाही. त्यामुळे धरणग्रस्तांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी धरणग्रस्तांसाठी मोबदला, पुनर्वसन पॅकेज, नागरी सुविधा, कुटुंबसंख्या तफावत, इतर योजनांचा लाभ असे विविध प्रश्न प्राधान्याने सोडवले पाहिजेत, अशी मागणी केली.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, धरणग्रस्तांना ४२६.२६ कोटी रुपयांचे वाटप झाल्याचे सांगण्यात येते, मात्र काही कुटुंबांना अर्धवट रक्कमेचे वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे या विषयी आक्षेप निर्माण झाले आणि त्या अनुषंगाने आम्ही सदस्यांनी शासनाकडे तक्रारी केल्या आहेत. धरणग्रस्तांना योग्य तो न्याय मिळाला पाहिजे अशी मागणी अधोरेखित करतानाच संपूर्ण पुनर्वसनासाठी देण्यात येणाऱ्या मोबदल्याची पूर्ण प्रकिया आणि या धरणाचे काम किती कालावधीत होईल, अशी विचारणा सभागृहात केली.

मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सभागृहात उत्तर देताना सांगितले की, पेण, नवी मुंबई, पनवेल, उरणमधील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून बाळगंगा धरणाला शासनाने २००९ साली मंजुरी दिली, पण न्यायालयीन बाबी, त्याचबरोबर कुटुंबसंख्या निश्चिती आणि काही आक्षेप असल्यामुळे या धरणाचे काम प्रलंबित राहिले, परंतु अलीकडेच या संदर्भात निर्णय पारित केला आहे. भूसंपादन अधिनियम १३नुसार संपादन प्रक्रिया राबविण्यात आली आहे. जवळपास १३ गावे आणि १७ वाड्यांचे पुनर्वसन यामध्ये होत आहे.

बाळगंगा धरण प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ६८० कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे. यापैकी ४२६ कोटी रुपये वाटपास उपलब्ध झाले आणि ४.२४ कोटी रुपये न्यायालयात केसेस असल्यामुळे ही रक्कम न्यायालयाकडे जमा करण्यात आली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जानेवारी महिन्यात बैठक झाली. या बैठकीत जे प्रश्न होते त्या संदर्भात काही निर्णय झाले. मुळात धरणाकरिता लागणारी रक्कम आहे ती देण्याचा निर्णयसुद्धा झाला. मुख्यमंत्री महोदयांनी ही जबाबदारी सिडकोला सोपवली आणि सिडकोनेही या विषयी मान्यता देऊन बोर्ड मिटिंगमध्ये या विषयाला मंजुरी दिली आहे तसेच कुटुंबसंख्या निश्चितीची तक्रार होती ती फेरतपासणी करून २४७४ इतकी कुटुंबसंख्या निश्चित झाली आहे आणि या प्रकल्पाच्या सुधारित पुनर्वसन आराखड्याला सरकारने ४ मार्च रोजी मान्यता दिली आहे. ८७७.२२ कोटी एवढ्या रकमेचा प्रस्ताव हा मान्यतेच्या संदर्भात विभागीय आयुक्तांना कळवण्यात आला आहे. त्यामुळे प्रकल्प आणि प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न दूर होऊन प्रकल्पाचे काम लवकरच मार्गी लागेल, असे मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

'आर्थिक गुन्हे रोखण्यासाठी महाराष्ट्र इंटेलिजन्स युनिटची स्थापना'/२

नियोजित डम्पिंग ग्राउंडविरोधात लवजी ग्रामस्थांचा मोर्चा/५

बांगलादेशच्या मुशफिकुर रहीमची वनडेमधून निवृत्ती/८

# मच्छिमारांचे प्रश्न अधिवेशनात!

## डिझेल परतावा, बोटीला नुकसानभरपाई, पीक विम्याप्रमाणे मच्छिमारांसाठी योजना सुरू करा

**पनवेल, मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मच्छीमार बांधवांच्या विविध समस्यांवर लक्ष वेधले. त्यांनी डिझेल परतावा, अलिबाग दुर्घटनेतील बोटीला भरपाई आणि मच्छिमारांसाठी पीक विमा धर्तीवर योजना राबविण्याची मागणी केली. मत्स्य व्यवसायमंत्री नितेश राणे यांनी या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेतली असून डिझेल परतावा नियमित देण्याची आणि अलिबाग दुर्घटनेतील मच्छिमारांना जास्तीत जास्त मदत करण्याची ग्वाही दिली.

राज्यातील मच्छीमार बांधवांच्या अनेक सोसायट्यांना डिझेल परताव्याची रक्कम मिळण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला होता. या प्रश्नाच्या अनुषंगाने आमदार महेश बालदी यांनी मच्छिमारांचे इतर प्रश्न सभागृहात मांडले. डिझेल परतावा, अलिबाग दुर्घटनेतील बोटीला भरपाई, पीक विम्याप्रमाणे मच्छिमारांसाठी योजना असे विषय मांडत सभागृहाचे लक्ष मच्छिमारांच्या विषयावर वेधले. या संदर्भात राज्याचे मत्स्यव्यवसायमंत्री नितेश राणे यांनी सकारात्मक भूमिका घेऊन मच्छिमारांना दिलासा देणार असल्याचे आश्वासित केले.

सभागृहात विषय मांडताना आमदार महेश बालदी यांनी म्हटले की, मासेमारी बोटींची नोंदणी करताना कौल अर्थात परमिट, परवाना नमुना आणि बंदर परवाना दिले जातो आणि त्या अनुषंगाने मासेमारी केली जाते. पाच-सहा वर्षांपूर्वी अनेक बोटींमध्ये पर्सनेट सापडले होते आणि त्यांचा परवाना शासनाने आता रद्द केला आहे. गाडीने सिग्नल तोडला म्हणून संपूर्ण गाडी फोडणे अन्यायकारक आहे; त्याचप्रमाणे ही कारवाई झाली आहे. आपण अनेक बंदरे उभारली आणि त्यातून देशाला फॉरेन एक्स्चेंज मिळवून दिला जात आहे. अशातच या

### आमदार महेश बालदी यांची मागणी



### मत्स्य व्यवसायमंत्री नितेश राणेंची सकारात्मक भूमिका

बोटींचा डिझेल परतावा रोखला गेला आहे, जो लवकरात लवकर त्या मच्छिमारांना देण्यात यावा, असे नमूद करतानाच मागील महिन्यात अलिबाग समुद्रकिनारी एक बोट पूर्णपणे जळली आणि जवळपास एक कोटी २० लाख रुपयांचे नुकसान मच्छिमाराचे झाले आहे. त्यामुळे त्या मच्छिमाराला राज्य शासनाने जास्तीत जास्त मदत करावी, अशी मागणी आमदार महेश बालदी यांनी केली. त्याचबरोबर ज्याप्रमाणे एक रुपयात पीकविमा दिला जातो त्या धर्तीवर मच्छिमारांसाठी योजना करावी, अशी आग्रही मागणीही त्यांनी केली.

या वेळी मंत्री नितेश राणे यांनी सांगितले की, डिझेल परतावा नियमित देण्यासाठी तशी तरतूद केली जात आहे. नियमांचे पालन करून मच्छिमारी करणाऱ्या बोटींना डिझेल परतावा देण्याचे शंभर टक्के काम केले जाणार आहे. मच्छिमारांच्या नौकांचे नुकसान होते त्या वेळी आपण त्यांना शासनाकडून मदत देतो. अलिबाग दुर्घटनेतील बोटीच्या मच्छिमारांशी मी चर्चा केली आहे. त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी मदत झाली पाहिजे यासाठी जास्तीत जास्त मदत करणार असल्याची ग्वाहीसुद्धा ना. राणे यांनी सभागृहात दिली.

## निवडक

### महाकुंभात हल्ल्याचा कट रचणारा दहशतवादी अटकेत

**लखनऊ** : प्रयागराजमधील त्रिवेणी संगमावर नुकत्याच झालेल्या महाकुंभात हल्ल्याची योजना आखणाऱ्या खलिस्तानी दहशतवाद्याला उत्तर प्रदेश पोलिसांनी कौशांबी येथून अटक केली आहे. लाजर मसीह असे या दहशतवाद्याचे नाव असून त्याच्याकडून तीन हातबॉम्ब, दोन डिटोनेटर, एक पिस्तूल, १३ जिवंत काडतुसे आणि दोन जिलेटिन रॉड जप्त करण्यात आले आहेत. मसीह हा पाकिस्तानमधील आयएसआय एजंट्सच्या संपर्कात होता.

### भाजप युवा मोर्चा अध्यक्ष तेजस्वी सूर्या विवाहबंधनात

**बंगळुरू** : भारतीय जनता पक्षाचे तरुण खासदार आणि युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष तेजस्वी सूर्या विवाहबंधनात अडकले आहेत. त्यांनी लोकप्रिय गायिका भरतनाट्यम नृत्यांगना शिवश्री स्कंदप्रसादशी गुरुवारी (दि. ६) लग्न केले. या विवाहसोहळ्याला दोघांचे कुटुंबीय व मोजकेच पाहुणे उपस्थित होते. अनेक नेत्यांनी सोशल मीडियावर तेजस्वी व शिवश्री यांच्या लग्नाचे फोटो शेअर करून नवदाम्पत्याला शुभेच्छा दिल्या आहेत.

## कामोठ्यात रस्त्यावर सापडल्या बारावीच्या उत्तरपत्रिका

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठे येथे बारावीच्या उत्तरपत्रिका रस्त्यावर सापडल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ मुंबई विभागाकडून स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली आहे.

बारावीच्या बुककीपिंग विषयाची परीक्षा २८ फेब्रुवारी रोजी झाली होती. त्याच्या २५ उत्तरपत्रिका कामोठे बसस्टॉपच्या जवळ झाडीत टाकलेल्या आढळल्या. यातील काही उत्तरपत्रिका फाटलेल्या होत्या. एका जेसीबीचालकाने काही मुलांना पेपर टाकताना पाहिले होते असे कळते.

कळंबोलीतील एका शिक्षकाकडे या उत्तरपत्रिका तपासायला आल्या होत्या. तपासलेल्या उत्तरपत्रिका ते दुचाकीवरून मॉडरेटरकडे घेऊन जात असताना पिशवीतून एक गठ्ठा पडल्याचे त्यांनी सांगितले तसेच या शिक्षकाने कामोठे पोलीस ठाण्यात उत्तरपत्रिकेचा एक गठ्ठा हरवल्याची



> **कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल. उत्तरपत्रिका तपासलेल्या होत्या. या प्रकरणी नियमानुसार कारवाई होईल.**
> **-ज्योत्स्ना शिंदे, प्रभारी विभागीय सचिव, मुंबई विभाग**

कल्पना दिली असल्याचे समजते.

सापडलेल्या उत्तरपत्रिकांची पाहणी मुंबई विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि. ६) दुपारी केली. त्यानंतर त्या उत्तरपत्रिका संबंधित शिक्षकाकडे सुपूर्द करण्यात आल्या.

## मुंबईत लवकरच धावणार बाईक टॅक्सी

**मुंबई : प्रतिनिधी**

वाहतूक कोंडी, टॅक्सीसाठी द्यावे लागणारे जास्तीचे पैसे यातून लवकरच मुंबईकरांची सुटका होणार आहे. राज्याच्या परिवहन खात्याकडून मुंबईत बाईकटॅक्सी सुरू करण्यासंदर्भात वेगाने प्रक्रिया सुरू असून पुढील काही दिवसांत या निर्णयाला मंजुरी दिली जाणार असल्याची माहिती राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.



विधानभवन परिसरात मंत्री प्रताप सरनाईक यांनी माध्यमांशी संवाद साधला. या वेळी मुंबईत बाईक टॅक्सी चालवण्याच्या निर्णयाबद्दल विचारण्यात आले असता त्यांनी सविस्तर माहिती दिली. तरुण-तरुणींना रोजगार मिळावा आणि प्रवाशांच्या प्रवासावरील खर्च कमी व्हावा म्हणून यासाठी देशातील २२ राज्यांमध्ये बाईक टॅक्सी चालू आहे. राज्य सरकारनेही तो निर्णय घेण्याचे ठरवले आणि प्रक्रिया सुरू आहे, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

या महिन्यातच बाईक टॅक्सीला मंजुरी मिळेल असे मला वाटते, कारण काही सुरक्षिततेचे नियम जे आहेत ते बाईक टॅक्सी चालवताना प्रवाशांसंदर्भात घेणे गरजेचे आहे. गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे बाईक टॅक्सी चालवताना तरुण वा तरुणीसोबत कोणताही गुन्हा घडणार नाही यासाठी काही निर्णय परिवहन खात्याच्या माध्यमातून घ्यायचे आहेत, असेही सरनाईक म्हणाले.

### रोजगार निर्मिती होणार

एक गोष्ट नक्की आहे की, या राज्यातील १० ते २० हजार तरुण-तरुणींना रोजगार मिळण्यासाठी बाईक टॅक्सीसेवा सुरू करण्याचा निर्णय घेण्याचे राज्य सरकारने ठरवले आहे. लवकरच त्या बाबतीत घोषणा होईल, कारण मुख्यमंत्र्यांचा जो शंभर दिवसांचा कार्यक्रम आहे, त्यामध्ये बाईक टॅक्सीला निर्णय देण्याचाही समावेश आहे, असे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक म्हणाले.

## 'मुंबईची भाषा मराठी याबाबत दुमत नाही!'

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राची भाषा मराठी आहे आणि मुंबई हा महाराष्ट्राचाच भाग आहे. त्यामुळे मुंबईची भाषा मराठी याबाबत दुमत असल्याचे काहीही कारण नाही, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भय्याजी जोशी यांनी स्पष्ट केले आहे.

आरएसएसचे माजी सरकार्यवाह जोशी यांनी बुधवारी मुंबईतील एका कार्यक्रमात केलेल्या विधानाने वाद निर्माण झाला. यावर त्यांनी खुलासा करीत म्हटले की, मी स्वतः मराठी भाषिक आहे. माझ्यअंतःकरणामध्ये मराठी भाषेचा अभिमान आहे. भारताची एक विशेषतः आहे की, येथे विविध भाषा बोलणारे लोक परस्परांना सोबत घेऊन चालतात. त्यांच्यात भाषेमुळे प्रश्न निर्माण होत नाही. म्हणूनच भारत देश हे जगासमोर आदर्श उदाहरण आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात मसाल्यांचे उत्पादन जोमात

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**


श्रीवर्धन तालुक्यात निसर्गाने मोठे आघात केले आणि नारळ, सुपारी झाडांचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर बागायतदारांना उत्पन्नाचे नवे मार्ग शोधावे लागले. सामान्यतः नारळ, सुपारीचे उत्पादन मिळवण्यासाठी किमान चार ते पाच वर्षे लागतात. त्यामुळे बागायतदारांनी एक नवा पर्याय निवडला तो म्हणजे मसाल्याची पिके. यातून तुलनेने कमी काळात चांगले उत्पादन मिळवता येत आहे.



श्रीवर्धन तालुक्यात निसर्ग वादळामुळे नारळ आणि सुपारीच्या झाडांचे ८०%पर्यंत नुकसान झाले. त्यानंतरही अनेक वादळे आली. या पार्श्वभूमीवर बागायतदारांनी उर्वरित जागेत नव्याने माड व सुपारी रोपांची लागवड केली आणि या रोपांच्या मध्ये मोकळ्या जागेत मसाला पिकांची लागवड करण्यात आली. अशा प्रकारे नारळ, सुपारी उत्पादनासाठी लागणाऱ्या काळाची भरपाई मसाल्यांद्वारे केली जाऊ लागली आहे.

### बागायतदारांकडून निसर्ग वादळानंतर नवा पर्याय

श्रीवर्धन तालुक्यात मसाला पिकांची लागवड जोमाने होत लागली आहे. हळद (३०.११ हेक्टर), लवंग (११.०० हेक्टर), दालचिनी (२८.३७ हेक्टर), काळी मिरी (२४.५५ हेक्टर), मिरची (३६.८९ हेक्टर) आणि जायफळ (२९.८७ हेक्टर) या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात झाली आहे. शिवाय



आंतरपिकांना अतिरिक्त मात्रेत पाणी आणि खत दिल्यामुळे माड आणि सुपारीच्या उत्पादनात ४० ते ६०% वाढ झाली आहे.

अशा प्रकारे श्रीवर्धन तालुक्यात नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेल्या अडचणींवर मात करीत बागायतदारांनी नवे मार्ग शोधले आहेत. मसाला पिकांची लागवड, आंतरपिकांचे उत्पादन आणि नव्या व्यवसायाच्या संधी बागायतदारांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणत आहेत. सध्या मसाले पिकांची चलती पहावयास मिळत आहे.

### उत्पन्नाचे चांगले साधन

वर्षभर उत्पादन देणारी हळद, लवंग, दालचिनी, काळी मिरी, मिरची आणि जायफळ यांसारखी मसाला पिके सध्या चांगली वाढत आहेत. ही पिके बागायतदारांना दरवर्षी उत्पादन देत असून ती थेट बाजारपेठेपर्यंत पाठवून ते उत्पन्न मिळवतात. यामुळे बागायतदारांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे आणि महिला गटांसाठीही घरगुती मसाल्याचा व्यवसाय करण्याच्या दृष्टीने एक चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे.

# मार्चच्या सुरुवातीलाच पारा चढला

## अंगाची लाही लाही; वाढत्या उष्णतेमुळे नागरिक हैराण

**मुंबई : प्रतिनिधी**

मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाचा पारा वाढत असल्याचे पहायला मिळत आहे. सकाळच्या काहीशा गारव्यानंतर दिवसभर मात्र उन्हाची तीव्रता असल्याने आरोग्यावरदेखील त्याचा मोठा परिणाम दिसून येत आहे.



वाढत्या उन्हामुळे नागरिकांच्या अंगाची अक्षरशः लाही लाही होत आहे. परिणामी उष्माघाताच्या रुग्णांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. बदलत्या वातावरणाशी जुळवून घेताना नागरिकांना त्रास जाणवत आहे.

उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी लोक डोक्यात टोपी, डोळ्याला चष्मा आणि इतर तत्सम वस्तूंचा वापर करत आहे. दुपारच्या सुमारास रस्त्यांवर शांतता दिसून येते. सकाळच्या थंडीनंतर दिवसभर उन्हाची तीव्रता वाढत असल्याने शीतपेयांच्या दुकानांवर गर्दी केली जात आहे.

उन्हाचा पारा एप्रिल, मे महिन्यात अधिक प्रमाणात दिसून येईल, अशी चिन्हे आहेत. तापमान वाढू लागल्याने नागरिकांनी योग्य खबरदारी घेण्याची आवाहन आरोग्य विभागाकडून केले जात आहे. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ देऊ नका, विनाकारण उन्हामध्ये बाहेर जाऊ नका. कामानिमित्त बाहेर जायचे असेल तर छत्री, टोपी, हेल्मेट घाला, घरातील स्वच्छ पाणी बाहेर जाताना घेऊन निघा, सैल, सुती व फिकट रंगांचे कपडे परिधान करा, असा सल्ला आरोग्य अधिकाऱ्यांनी दिला आहे.

# आर्थिक गुन्हे रोखण्यासाठी महाराष्ट्र इंटेलिजन्स युनिटची स्थापना -ना. कदम

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात आर्थिक गुंतवणुकीच्या व्यवहारासाठी येणाऱ्या कंपन्या खऱ्या आहेत की फसव्या हे तपासण्यासाठी व भविष्यात टोरेस कंपनीसारखे आर्थिक गुन्हे होऊ नयेत यासाठी महाराष्ट्र इंटेलिजेन्स युनिटची स्थापना करण्यात येणार असल्याची माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत दिली.



सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना राज्यमंत्री श्री. कदम बोलत होते. यावेळी चर्चेमध्ये सदस्य मनीषा कायंदे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, शशिकांत शिंदे यांनी सहभाग घेतला.

टोरेस प्रकरणी पोलीस प्रशासन योग्य कार्यवाही करत असल्याचे सांगून राज्यमंत्री कदम म्हणाले, याप्रकरणी आतापर्यंत ७ जणांना अटक करण्यात आली असून १६ हजार ७८६ जणांची सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तर याप्रकरणी ४९ कोटी २ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार गुंतवणुकदारांचे पैसे परत करण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे.

या हस्तगत केलेल्या मुद्देमालाचा लिलाव करण्यात येतो आणि त्यातून विहित नियमांनुसार गुंतवणुकदारांना पैसे परत केले जातात. त्यानुसार आर्थिक गुन्हे कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे. उर्वरीत वसुलीसाठी कंपनीच्या सर्व मालमत्ता जप्त करण्यात येतील. या मालमत्तांमधूनही वसुली न झाल्यास कंपनी संचालकांच्या इतर ठिकाणी असलेल्या मालमत्तांवर कारवाई करण्यात येईल. याप्रकरणी शासन कडक कारवाई करेल अशी माहिती दिली.

## कोळीवाडे कायमस्वरूपी करण्यासाठी आमदार मंदा म्हात्रेंचे मुख्यमंत्र्यांना साकडे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

एके काळी छत्रपती शिवरायांच्या आरमारात स्थान असलेला ,कोळीराजा आज आपल्याच घरात उपरा झाला आहे. एकीकडे २०११ पर्यंतच्या झोपड्यांना अधिकृत दर्जा मिळाला पण शेकडो वर्षे असलेला कोळीवाड्याच्या पुनर्विकासाचे घोंगड भिजत पडलं आहे. त्याच बरोबर वाढते कुटुंब लक्षात घेता कोळीवाड्यातील कोळी बांधवांची घरे व जागा कायमस्वरूपी नसल्याने घरांची पुनर्बांधणी करतांना नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांच्या मार्फत सरसकट् तोडक कारवाई केली जाते. त्यामुळे घरांची पुनर्बांधणी करतांना नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्ताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे लक्षात येताच बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एका निवेदनातून साकडे घातले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार तसेच विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना सदर कोळी बांधवांची घरे व जागा कायमस्वरूपी करणे संदर्भात कोळी बांधव व संबंधित अधिकाऱ्यासमवेत बैठक आयोजित करण्याची मागणी आमदार म्हात्रे यांनी केली होती नवी मुंबईतील कोळी बांधवांची घरे व जागा कायमस्वरूपी नसल्याने घरांची पुनर्बांधणी करण्यास कठीण होत आहे.

अर्थसंकल्पिय अधिवेशनात सदर प्रश्नना बाबत लवकरात लवकर कोळी बांधव व संबंधित अधिकाऱ्यासमवेत बैठक आयोजित करून सदरचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल असे आमदार मंदा म्हात्रे यांना प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

## मुंबईत तीन ठिकाणी विवाहपूर्व संवाद केंद्र

### महिला दिनी होणार उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

राष्ट्रीय महिला आयोगाच्या मार्गदर्शनाखाली बृहनमुंबई महानगरपालिकेच्या सहयोगाने भारतीय स्त्री शक्ती तर्फे मुंबईमध्ये तीन ठिकाणी 'विवाह पूर्व संवाद' केंद्र सुरू होत आहेत.

विवाह हा स्त्री आणि पुरुष दोघांच्याही आयुष्यातील महत्त्वाचा निर्णय असतो. विवाहानंतर दोघांचं नातं हे जर सशक्त असेल तरच ते यशस्वी होते. आज आपण फॅमिली कोर्टात तरुण मुलामुलींची कौटुंबिक वादाच्या व घटस्फोटाच्या खटल्यांची जी आकडेवारी बघतो आहोत ती चिंताजनक आहे. ह्याला आळा घालण्यासाठी 'विवाहपूर्व कुटुंब संवाद केंद्रांची' मोठ्या प्रमाणात गरज आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांनी अशी 'विवाहपूर्व कुटुंब संवाद केंद्र' देशभरात सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे.मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने भारतीय स्त्री शक्ति तर्फे मुंबईमध्ये परेल, विले पार्ले आणि बोरीवली अश्या तीन ठिकाणी 'विवाह पूर्व संवाद' केंद्र सुरू केले जाणार आहेत.

भारतीय स्त्री शक्ति १९८८ पासून महिला आणि कुटुंबांच्या सशक्तीकरणाचे काम करते अशी माहिती संस्थेच्या पदाधिकारी सीमा देशपांडे यांनी दिली.

## कर्मचारी कल्याणाला 'हायकल'चे प्राधान्य; सुरक्षा मास २०२५ला सुरुवात

**महाड : प्रतिनिधी**

कार्यस्थळावरील सुरक्षितता आणि परिचालन उत्कृष्टतेप्रती आपली वचनबद्धता अधिक दृढ करत, हायकल लिमिटेडने सुरक्षा मास अभियान सुरू केले आहे. 'आमची सुरक्षितता, माझी जबाबदारी' या संकल्पनेवर आधारित हे अभियान ४ मार्च ते ३१ मार्च दरम्यान राबविले जाणार आहे. या अंतर्गत विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन केले जाईल, जे व्यक्तिगत जबाबदारीसोबतच एकत्रित सुरक्षितता प्रक्रियांना प्रोत्साहन देतील.

हायकलचा विश्वास आहे की, सुरक्षितता ही सर्व कर्मचाऱ्यांची सामाईक जबाबदारी आहे. या संस्कृतीला अधिक दृढ करण्यासाठी कंपनीने २१ दिवसीय सेफ्टी चॅलेंज सुरू केले आहे. या संरचित कार्यक्रमात कर्मचारी विविध सुरक्षितता उपक्रमांमध्ये सहभागी होतील, ज्यामध्ये धोक्यांची ओळख, वैयक्तिक सुरक्षा उपकरणांचे पालन आणि आपत्कालीन परिस्थितींमध्ये तत्परता यांसारख्या महत्त्वाच्या बाबींचा समावेश असेल. हा उपक्रम कर्मचार्यांना स्वतःच्या, तसेच सहकाऱ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेण्यास प्रोत्साहन देतो आणि सुरक्षित वर्तन केवळ घटना घडल्यानंतरचा प्रतिसाद नसून, ती एक सवय असली पाहिजे, हा संदेश अधोरेखित करतो. सुरक्षितता अधिक सोपी आणि आकर्षक करण्याच्या उद्देशाने हायकल 'सेफ्टी इन माय पॉकेट' हे उपक्रम सुरू करत आहे. उपक्रमामुळे प्रत्येक कर्मचारी कार्यस्थळी सुरक्षितता राखण्यासाठी सक्रिय योगदान देईल, एक जबाबदार आणि सुरक्षित कामाचा परिसर निर्माण केला जाईल.



## कर्जतच्या दुय्यम निबंधक कार्यालयाला लागली आग

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील टेकडीवर असलेल्या ब्रिटिश कालीन इमारतीत सुरू असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालय परिसरात गुरुवारी सायंकाळी आग लागली. कर्जत नगरपरिषदेची अग्निशामक दलाच्या दोन गाड्या वेळेत पोहचल्याने मोठी दुर्घटना टळली.

सदर कार्यालय टेकडीवर असल्याने या परिसरात आग आटोक्यात येण्यास खुप कष्ट घ्यावे लागले. हवा सुटल्याने एक ठिणगी कार्यालयाच्या छपरावर असलेल्या प्लास्टिकच्या कापडावर पडली आणि आग लागली. असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला.

नवीन प्रशासकीय इमारत पूर्ण होऊन तेथे तहसीलदार व उप विभागीय अधिकारी कार्यालयाचे स्थलांतर झाले. मात्र दुय्यम निबंधक कार्यालयाचा कारभार अजूनही सन १९०७ मध्ये टेकडीवर ब्रिटिशकालीन इमारतीतून चालतो. या ठिकाणी अनेक महत्त्वाची कागदपत्रे साठवलेली आहेत. या आगीमुळे दस्तऐवज नष्ट झाले असते. मात्र कर्जत नगरपरिषदेच्या अग्नीशामक दलाच्या दोन गाड्या तेथे वेळेवर पोहोचल्याने पुढील दुर्घटना टळली.याच इमारतीत तहसीलदार यांचे अखत्यारीतील ट्रेझरी रूम आणि पोलीस कस्टडी (लॉकअप) याच ठिकाणी असल्याने कोणतीही दुर्घटना या ठिकाणी घडू शकते. प्रशासनाने हे विभाग सुद्धा स्थलांतरित करावेत.



**येथील पडक्या वास्तूची हलाखीची स्थिती आहे. येथे साप आढळतात, तर जंगल भाग असल्याने आग नेहमी लागत आहे. पावसाळ्यात पाण्यामुळे भयानक परिस्थिती असते. येथील रेकॉर्ड असुरक्षित आहे. नागरी सुविधा या परिसरात उपलब्ध नाहीत. नागरिकांचे हाल होत आहेत . लवकरच नविन प्रशासकीय भवन येथे कार्यालय स्थलांतरित करावे हीच अपेक्षा आहे.**

**–एस.व्ही. सावंत,**
**दुय्यम निबंधक, कर्जत**

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत खालापुरात विशेष तपासणी मोहीम



**खोपोली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम विशेष तपासणी मोहीम खालापूर तालुक्यात सुरू झाली असून आरोग्य विभागाची दोन पथक शाळा अंगणवाडीतून सुमारे ७हजार १७२ मुला मुलींची तपासणी करणार आहेत. सर्व शासकीय निमशासकीय शाळा व अंगणवाडीतील शून्य ते अठरा वयोगटातील बालक व किशोरवयीन मुला–मुलींची सर्वांगीण तपासणी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत होणार आहे. तपासणी मोहिमेचे विविध टप्पे तयार करण्यात आले असून त्यानुसार अंगणवाडी आणि शाळेसाठी वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार तालुक्यातील शाळा आणि अंगणवाडी मध्ये पथक भेट देणार असून आरोग्य तपासणी होणार असल्याची माहिती पंचायत समितीच्या आरोग्य विभागाचे अधिकारी प्रशांत आंबुर्ले यांनी दिली

त्यासाठी नेमण्यात आलेल्या आरोग्य विभागाच्या एका पथकात दोन डॉक्टर एक आरोग्य सेविका आणि एक औषध शास्त्रज्ञ असणार आहे. ३१मार्च पर्यंत शाळा ,अंगणवाडी मध्ये विद्यार्थी, विद्यार्थिनींची तपासणी करण्यात येईल यामध्ये विद्यार्थ्यांची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात येऊन गरजेनुसार औषध उपचार करण्यात येणार आहेत.

या मोहिमेसाठी दोन वेगवेगळी पथक आहेत. मुला–मुलींची संपूर्ण आरोग्य तपासणीनंतर आवश्यकतेनुसार एक्सरे, रक्त तपासणी करण्यात येईल.आवश्यक औषध देखील देण्यात येतील.असे डॉक्टर नूतन भाटकर यांनी सांगितले

## श्रीवर्धन आगर विभागात, समुद्रकिनारी रानडुकराचा वावर, नागरिकांमध्ये घबराट

**श्रीवर्धन : बातमीदार**

महिन्याभरापासून श्रीवर्धन शहरामध्ये एका रानडुकराचा वावर असल्याचे बोलले जात आहे. सदरचे रानडुक्कर हे चांगलेच मोठे असून एका म्हशीच्या वासरा एवढे दिसायला आहे असे जाणकारांचे मत आहे. श्रीवर्धन शहरातील आगर विभागात व समुद्रकिनारी असलेल्या ओसाड शेतीमध्ये सदर रानडुकराचा नियमितपणे वावर असून, हे डुक्कर रात्रीच्या वेळी फिरत असते. त्यामुळे अनेक वेळा असंख्य कुत्रे या डुकराला पाहून भुंकत असतात. श्रीवर्धन शहरातील आगर विभागामध्ये खूप मोठ्या प्रमाणात नारळ, सुपारीच्या व केळीच्या बागा आहेत.



या बागांमध्ये दिवसा पाणी लावण्याच्या निमित्ताने किंवा साफसफाईच्या निमित्ताने माणसांचा वावर असतो. परंतु रात्रीच्या वेळी हा भाग पूर्णपणे निर्मनुष्य असतो. अशाच वेळी सदरचे रान डुक्कर या भागामध्ये फिरत असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. अनेक नागरिकांनी सायंकाळच्या वेळेस, रात्रीच्या वेळेस किंवा सकाळी लवकर या डुकराला रस्ता क्रॉस करताना देखील पाहिलेले आहे.

सदर रानडुकराने अनेक नागरिकांच्या वाड्यांमध्ये देखील खड्डे खणल्याचे दिसून येते व त्या ठिकाणी डुकराच्या पायांच्या खुराच्या खुणा जमिनीमध्ये आढळून येतात. श्रीवर्धन शहरामध्ये रानडुकराच्या वावरामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी वनविभागाने या रानडुकराची लवकरात लवकर शोध मोहिम हाती घेऊन, सदर डुकराला पकडण्यात यावे. अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## रोजगार मेळावा व युवाकार्य प्रशिक्षण योजना उमेदवार निवड मेळाव्याचे आयोजन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड–अलिबाग व महाड मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, महाड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांकरिता दि.१२ मार्च रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०२.०० या वेळेत महाड मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन, प्लॉट न.पी–४३, एमआयडीसी परिसर, महाड येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना उमेदवार निवड मेळावा आयोजित केला असून जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा फायदा लाभा घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिती पवार यांनी केले आहे.

जिल्ह्यातील नामांकीत १० आस्थापनांकडील रिक्तपदांच्या, इंटर्नशिप भरतीसाठी रोजगार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात एस.एस.सी./एच.एस.सी, आय.टी.आय., डिप्लोमाइंजिनियर, पदवीइंजिनियर, व इतर पदवीधारक नोकरी इच्छूक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. या विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज करता येईल. रोजगार मेळाव्यातील रिक्तपदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## उरणमध्ये आरोग्य तपासणी मोहीम



**उरण : बातमीदार**

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत उरण तालुक्यामध्ये ३१ मार्च २०२५ पर्यंत तालुक्यातील सर्व शासकीय निमशासकीय व अंगणवाडीतील ० ते १८ वयोगटातील बालकांची व किशोरवयीन मुला–मुलींची सर्वांगीण आरोग्य तपासणी मोहीम ही राबविण्यात येणार असून या मोहिमेअंतर्गत विविध तारखांना नियोजनानुसार त्या त्या शाळेमध्ये तपासणी होणार आहे.

शिक्षण विभाग व एकात्मिक बाल विकास प्रकल्प उरण व नागरिकांनी याची नोंद घेऊन सदर मोहीम यशस्वी करण्याकरता प्रयत्न करावेत, असे आवाहन उरण तालुका आरोग्य अधिकारी राजेंद्र इटकरे यांनी केले आहे.

## वणव्यात होरपळलेल्या झाडांना नवसंजीवनी; खोपोलीच्या मॉर्निंग स्टार ग्रुपचा उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिकेच्या माध्यमातून शेडवली उपनगरात असलेल्या माळरानावर जुलै २०२४ मध्ये मियावाकी गार्डनची निर्मिती करून एक नवा पर्यावरणपूरक उपक्रम राबवून हजारो झाडांची लागवड करण्यांत आल्यामुळे,या झाडांचे संगोपन आणि संवर्धन केले जात होते.दुर्दैवाने शेडवली परिसरात लागलेल्या वनव्यांमुळे वाढ झालेली बहुतांशी झाडे होरपळून गेली. पहाटे मॉर्निंग वॉक साठी मॉर्निंग स्टार ग्रुपच्या सदस्यांच्या ही बाब लक्षात आली.त्यांनी लागलीच होरपळलेल्या मियावाकी गार्डनला पुनर्जीवित करण्यासाठी प्रयत्न सुरू केल्यामुळे झाडांना नवसंजीवनी निर्माण झाली

या ठिकाणी नगरपालिकेने विशेष कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यांत आली होती. त्याच सोबत ठिबक सिंचन पद्धतीने झाडांना माफक पाणी देण्याची सुविधा देखील उपलब्ध करून दिली होती. मात्र वणवा लागल्यामुळे ठिबक सिंचन यंत्रणादेखील जळून खाक झाली मात्र दररोज सकाळी ग्रुपच्या सर्व सदस्यांनी एकत्र येऊन अंग मेहनत करत प्रत्येक झाडाला पाणी देण्यांचा नित्यक्रम सुरू केला. यामुळे हळूहळू त्यांच्या प्रयत्नाला यश येताना दिसले व होरपळलेल्या झाडांना नवी पालवी फुटू लागली.



नगरपालिकेने सुरू केलेल्या या उपक्रमाचा लाभ खऱ्या अर्थाने पर्यावरणाला होणार असल्याने मियावाकी गार्डनला पुनर्जीवित करण्याची जबाबदारी स्वीकारून मॉर्निंग स्टार ग्रुपने केलेल्या प्रयत्नांचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी डॉ.अभिमन्यू चंदनशिवे,अमोल ठकेकर,दिनेश ओसवाल कौतुक केले.

## रोह्यात ज्येष्ठांना श्रवणयंत्राचे वाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

जागतिक श्रवण दिनानिमित्त (३ मार्च) रोहा सिटिझन फोरम आणि helpers of the handicapped यांच्या संयुक्त विद्यमाने कर्णबधिर ज्येष्ठ नागरिकांना मोफत श्रवणयंत्र मोल्डचे वाटप करण्यात आले. मंगळवारी ज्येष्ठ नागरिक सभागृहात श्रवणयंत्र वाटप करण्यात आले.



या वेळी व्यासपीठावर ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक अप्पा देशमुख, helpers of the handicapped संस्थेच्या रायगड जिल्हा युनिटच्या मुख्य रोशनी अमोल देशमुख, त्यांचे सहकारी निखिल बनसोड आणि दिनेश वाघे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष सरफळे रावसाहेब, सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष मारुती राऊत, सचिव सुरेश मोरे आदी उपस्थित होते.

रोशनी देशमुख यांनी, helpers of the handicapped या संस्थेचे मुख्यालय कोल्हापूर येथे असून ही संस्था गेली ४३ वर्षे गरजू अपंग लोकांसाठी काम करत असल्याचे सांगितले. ही संस्था संपूर्ण राज्यात कार्यरत असून मोफत श्रवणयंत्र वाटप या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष सरफळे रावसाहेब यांनी नितीन परब यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब यांनी helpers of the handicapped संस्थेचे आणि ट्रस्टला सहकार्य करणाऱ्या सहयोगी संस्थांचे तसेच मुझफ्फर मुल्ला यांचे आभार मानले. सुत्रसंचालन सुरेश मोरे यांनी केले.

# मोरा बंदरातील गाळ काढण्यास सुरुवात

## उरण-भाऊचा धक्का प्रवासी लाँचसेवा होणार सुरळीत

**उरण : प्रतिनिधी**

प्रवासी, लॉन्च मालकांच्या सातत्याने केलेल्या मागणीनंतर कोटी रुपये खर्च करून मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला तीन दिवसांपासून सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे उरण-भाऊचा धक्का गाळात रुतलेली प्रवासी लाँचसेवा सुरळीत होण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



मोरा बंदरात मागील अनेक वर्षांपासून गाळाची समस्या आ वासुन उभी आहे. बंदरातील गाळाच्या कायमच्या समस्येमुळे समुद्राच्या ओहोटीमुळे ठराविक काळावधीसाठी प्रवासी वाहतूक सेवा बंद ठेवण्यात येते. कधीकधी चार-पाच दिवस प्रवासी वाहतूकच बंदच ठेवण्यात येत असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होते. तर कधी कधी नवख्या सारंग-ड्रायव्हरमुळे लाँचेस गाळात रुतून बसतात. यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो. यामुळे प्रवासी संतप्त होतात.

दोन वर्षांपूर्वी चार कोटी रुपये खर्चून मोरा बंदरातील गाळ काढण्यात आला होता, मात्र त्यानंतरही मोरा बंदर गाळाने भरायचे अद्यापही थांबलेले नाही. त्यामुळे मोरा बंदरातील साचत असलेल्या गाळाची समस्या कायम स्वरुपी दूर करण्यासाठी प्रवासी, मुंबई जलवाहतूक संस्था, लॉन्च मालकांकडून सातत्याने मागणी केली जात होती.

अखेर बंदर विभागाने संबंधितांकडून केलेल्या मागणीची दखल घेतली आहे. तीन दिवसांपासून मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती मोरा बंदर विभागाचे अधिकारी नितीन कोळी यांनी दिली.

गाळाची समस्या दूर झाल्यानंतर या सागरी मार्गावरुन वर्षभर प्रवास करणाऱ्या सुमारे तीन लाख प्रवाशांना दिलासा मिळणार असल्याच्या प्रतिक्रिया मुंबई जलवाहतूक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

तीन कोटी रुपये खर्चून मोरा बंदरातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. मोरा बंदरातील गाळाची समस्या कायम स्वरुपी सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. बंदरात नेमका कोणत्या बाबी गाळाची समस्या निर्माण होण्यास कारणीभूत ठरतात.यासाठी अभ्यास गट तयार करण्यात आला आहे.त्यानंतर मोरा बंदरातील गाळाची समस्या कायमस्वरुपी दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार असल्याची माहिती मेरिटाईम बोर्ड मरिना विभागाचे कार्यकारी अभियंता प्रकाश चव्हाण यांनी दिली आहे.

# पनवेल पालिका उभारणार खारघर, तळोजात बस थांब्यावर निवारा शेड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल पालिकेक्कडून खारघर तसेच तळोजा परिसरातील बस थांब्यावर निवारा शेड उभारण्यात येणार असल्यामुळे प्रवासी समाधान व्यक्त करीत आहे.

नवी मुंबई महानपालिकेक्कडून खारघर परिसरात एनएमएमटीची बससेवा सुरू केल्यावर बस थांब्यावर प्रवाशांच्या सोयीसाठी निवारा शेड उभारण्यात आले होते. दरम्यान, खारघर वसाहत पनवेल महापालिकेक्कडे हस्तांतरण करण्यात आल्यामुळे एनएमएमटी प्रशासनाने निवारा शेडकडे दुर्लक्ष केले. दरम्यान, गेल्या पाच वर्षांत खारघर परिसरातील बस थांब्यावरील निवारा शेडची

### प्रवाशांना दिलासा

दुरवस्था झाल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. तसेच खारघर सेक्टर ३० ते ४० आणि तळोजा वसाहतमधील बस थांब्यावर निवारा शेड नसल्याने प्रवाशांसह आबालवृद्ध ग्रामस्थांचे हाल होत आहेत. त्यामुळे येथील ठिकाणी प्रवासी निवारा शेडची उभारण्याची मागणी व्हावी, अशी मागणी प्रवाशांसह रहिवाशांकडून केली जात होती.

विशेष म्हणजे तळोजा फेज दोनमधील बस थांब्यावर निवारा शेडअभावी प्रवाशांना ऊन-पावसात भिजत बसच्या प्रतीक्षेत उभे रहावे लागत आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन पनवेल महापालिका प्रशासनाकडून खारघर आणि तळोजा वसाहतमधील बस थांब्यावर नवीन आणि सुसज्ज असे निवारा शेड उभारण्यासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. प्रत्येक बस थांब्यांवर निवारा शेड उपलब्ध होणार असल्यामुळे प्रवासी समाधान व्यक्त करीत आहे.

निवारा शेडासाठी निविदा प्रक्रिया सुरू असल्याचे पनवेल महापालिकेचे अधिकारी सदाशिव कवटे यांनी सांगितले. महापालिकेच्या निर्णयामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# चार वाहनांच्या अपघातात तिघे जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कोन गावाच्या हद्दीत गुरुवारी झालेल्या चार वाहनांच्या अपघातात दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.



आज सकाळच्या सुमारास मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर मुंबई लेनवर कोन गावाजवळ पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत यातील कंटेनर (एनएल-०१-एएच- ८५९८) यावरील चालक हे पनवेल एक्झिट येथे थांबले होते, त्यांच्या बाजूला एक अनोळखी वाहन थांबलेले होते. त्यावेळी ट्रक (एमएच ५०-०५४५) चालक महेंद्र सिंग (वय ५०) व क्लीनर योगेंद्र सिंग (वय २२, रा. कोचीन) हे त्यांची गाडी चेक करण्यासाठी थांबले असता त्यांच्या मागून येणाऱ्या कंटेनर (एमएच ४६ बीएफ ७१४५) वरीलचालक रवींद्र मंगल यादव (वय ३५, रा. आझमगड, उत्तर प्रदेश) यांना पुढील वाहन अचानक दिसल्याने त्यांनी वाहनावरील नियंत्रण सुटून पुढील ट्रक (एमएच ५० ०५४५) याला पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यामुळे त्यांचे वाहन पुढील अनोळखी वाहनावर व बाजूच्या एनएल ०१-एएच ८५९८ या वाहनाला धडकून अपघात झाला.

या अपघातात चालक महेंद्रसिंग यांचे दोन्ही पायांना व चालक रवींद्र मंगल यादव यांचे पायाला, हाताला, पोटाला किरकोळ दुखापत झाली तसेच क्लीनर योगेंद्र सिंग यांचे डोळ्याला, डोक्याला, चेहऱ्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना आयआरबी अॅम्बुलन्सच्या मदतीने एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. एनएल ०१ एएच ८५९८ वरील चालक पळून गेलेला आहे.

या ठिकाणी पनवेल तालुका पोलिसांचे पथक तसेच पळस्पे वाहतूक शाखेचे पथक उपस्थित राहून त्यांनी अपघातग्रस्त वाहने आयआरबीच्या क्रेनच्या सहाय्याने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

# संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ उरणमध्ये आंदोलन

**उरण : बातमीदार**

शिवसेनेचे उरण तालुकाप्रमुख महेंद्र पाटील आणि उरण शहर प्रमुख सुलेमान शेख यांच्या नियोजनाने उरण चार फाटा येथे बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख यांचा वाल्मिक कराडने निर्घृणपणे केलेल्या हत्येच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले.



या आंदोलनात युवा सेना सचिव रूपेश पाटील, उरण विधानसभा प्रमुख मनोज घरत, चाणजे विभागीय उपतालुकाप्रमुख प्रशांत म्हात्रे, उपतालुका प्रमुख हेमंत भोईर, चाणजे पंचायत समिती विभाग प्रमुख कृष्णा पाटील, नवघर विभाग प्रमुख गणेश घरत, महिला आघाडी चाणजे विभाग प्रमुख बेबीताई पाटील, नवघर विभागीय उपतालुका प्रमुख अमित ठाकूर, उलवे शहर प्रमुख संदीप वायंगणकर तसेच प्रथम शेठ पाटील, सुधीर पाटील, शंकर पाटील आणि असंख्य शिवसैनिक व स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या आंदोलनाच्या माध्यमातून संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचा तीव्र निषेध करण्यात आला आणि दोषींना फाशीची शिक्षा करण्याची मागणी करण्यात आली.

# महात्मा फुले महाविद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये १० मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या समारंभास रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ज्ञानदेव म्हस्के, कुलगुरू, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा हे उपस्थित राहणार असून अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कांमगिरीचे कौतुक मान्यवरांच्या हस्ते केले जाणार असून त्यांना पारितोषिके दिली जाणार आहेत. सर्व नागरिकांनी, विद्यार्थ्यांच्या पालकांनी उपस्थित राहून गुणी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करावे व शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर यांनी केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कार्यक्रमाचे कार्यवाह डॉ. राजाराम पाटील, सहकार्यवाह प्रा.जिनगोंडा बोरगावे व उपप्रचार्य डॉ. नामदेव पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे.

# गणित प्राविण्य, प्रज्ञा परीक्षेत 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचे सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी ही गणित अध्यापक मंडळ, रायगड जिल्हा यांच्यातर्फे घेतल्या जाणाऱ्या गणित प्राविण्य, गणित प्रज्ञा परिक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.




गणित प्राविण्य या परिक्षेत पाचवीचे ३३ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये वेद मिलिंद नामे, अंकुश अविजित समंथा, अर्थ अनंत पांडव, अर्णव सचिन औटी, अंश सुब्रत दास, दुर्वा संदिप पाटील असे एकूण सहा विद्यार्थी गणित प्रज्ञा परिक्षेसाठी पात्र ठरले आहे. तसेच गणित प्राविण्य परीक्षेत आठवी मधून ४२ विद्यर्थी सहभागी झाले होते. मयांक महेश म्हामुणकर, अर्थव विजय पाटील, पूर्वी मंगेश पाटील हे विद्यार्थी गणित प्रज्ञा परिक्षेसाठी पात्र ठरले आहे.

दहावीसाठी गणित पारंगत परीक्षा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण ५१ विद्यार्थी सहभाग झाले होते पैकी धनराज राजेंद्र कांबळे जिल्ह्याातून ८५ गुण मिळवून प्रथम क्रमांक तसेच ऋत्विक शिवदास पाटील याने जिल्ह्याातून ७३ गुण तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

गणित या विषयाची भिती विद्यार्थ्यांच्या मनातून जावी, तसेच भविष्यातील स्पर्धा परिक्षांना सामोरे जाण्याची मानसिक तसेच बौद्धिक तयारी व्हावी या दृष्टीने आम्ही गणित संबोध परिक्षेला इयत्ता ५ वी आणि ८ वी तील सर्व विद्यार्थ्यांना प्रविष्ट करतो. तसेच १० वी तील विद्यार्थ्यांना बहुसंख्येने गणित पारंगत परिक्षेस प्रविष्ट करतो. त्यामुळे गणित विषय विद्यार्थ्यांना सोपा होता, असे या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी या वेळी सांगितले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी यश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

# अंताक्षरी स्पर्धेत 'सीकेटी'च्या शिक्षकांची चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आय.डब्ल्यू सी गॅलक्सी पॅनोरमा पनवेल, या संस्थेतर्फे शिक्षक दिनानिमित्त अंताक्षरी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये पनवेलमधील नमांकित शाळांतील शिक्षक सहभागी झाले होते.




या स्पर्धेमध्ये सीकेटी विद्यालयातील शिक्षक सरोज संतोष जीतेकर यांच्या गटाला प्रथम क्रमांक आणि प्राची ऋषिकेश इसे यांच्या गटाला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण सोहळा ३ मार्च २०२५ रोजी वासुदेव बळवंत फडके नाट्यागृहात झाला.

विजेत्या शिक्षक संघाचे विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी अभिनंदन केले. तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या शिक्षकांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

# गव्हाण विद्यालयात मेंदूज्वर प्रतिबंधक लसीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मेंदूज्वर अर्थात जापनीज इन्सेफेलाईटीस (जेई) या जीवघेण्या आजारावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आरोग्य विभागाच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील १५ वर्षांखालील विद्यार्थ्यांना मोफत लसीकरण करण्यात आले.



गव्हाण प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ. अस्मिता बोंबटकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने लसीकरण केले. लसीकरण करण्यापूर्वी आरोग्य पथकाचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी प्राचार्य गोवर्धन गोडगे व संस्थेचे लाईफ रवींद्र भोईर,ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, नववीचे वर्गशिक्षक शितलकुमार म्हात्रे व प्रमोद करावर तसेच दर्शना भोईर उपस्थित होते.

आरोग्य पथकामध्ये आरोग्य आधीपरिचारिका स्वप्नाली जांभळे, आरोग्य सेविका शिवकांता मेहत्रे, प्रणिता पाटील व समिक्षा आग्रावकर तसेच आरोग्य सहायिका भक्ती पालकर, आरोग्य कर्मचारी संजय गजानन वाघमारे, आशा वर्कर्स प्रतीक्षा कोळी,सुगंधा घरत, हेमा कोळी, सुनिता पाटील, मदतनीस हिरकण्या कोळी ह्या पथकातील सदस्यांनी ही लसीकरण मोहीम झाली.

आरोग्य पथकाचे स्वागत करताना विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी या आजारावरची प्रतिबंधात्मक कार्यवाही म्हणून लसीकरणाचे महत्त्व विषद केले तर प्रास्ताविकात सागर रंधवे यांनी डासांपासून तसेच इतर ज्या ज्या कारणामुळे हा आजार होतो त्याची कारणे सांगून त्याच्यावरती प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लसीकरण अत्यंत महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी या लसीकरणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. सायंकाळच्या सत्रात उपशिक्षक विशांत ठाकूर यांनी आरोग्य पथकाचे आणि लसिकरण मोहिम होणाऱ्या सर्व शिक्षक, वर्गशिक्षक व विद्यार्थी आणि पालकांचे आभार मानले.

# पनवेलमध्ये एकाच रात्री सोनसाखळी चोरीच्या दोन घटना

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात पादचारी महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. एकाच रात्री दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये पादचारी महिलांच्या गळ्यातून सोनसाखळी हिसकावण्याच्या घटना घडल्या.

यातील पहिली घटना खारघर उपनगरामध्ये सायंकाळी साडेसात वाजता उत्सव चौकाशेजारील रस्त्यावर घडली. तर दुसरी घटना त्याच रात्री नवीन पनवेल येथे शिवा कॉम्प्लेक्स समोरील रस्त्यावर रात्री सव्वा अकरा वाजता घडली. दोन्ही घटनांमध्ये अडीच लाख रुपये किमतीचे सोने चोरट्यांनी चोरून नेले.

पहिल्या घटनेत खारघर येथील महिलेच्या गळ्यातील एक लाख रुपयांची सोनसाखळी घेऊन दुचाकीवरून आलेला चोर पसार झाला. तर दुसऱ्या घटनेत एक लाख ६० हजारांचे मंगळसूत्र घेऊन चोरटे पसार झाले.

# एसटीच्या धडकेत पादचारी ठार

**पनवेल : वार्ताहर**

राज्य परिवहन महामंडळाच्या भरधाव बसने रस्त्यावर एका पादचाऱ्याला धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. कळंबोली सर्कल ते देवांशी इन हॉटेल येथील रस्त्यावर रात्री साडेदहा वाजता हा अपघात घडला. जगत हरदेव विश्वकर्मा असे मृताचे नाव आहे.




राज्य परिवहन महामंडळाची एसटीबस घेऊन चालक भरत सिंग राजपूत हे भरधाव वेगाने आणि रस्त्याकडे दुर्लक्ष देऊन बस चालवित होते. कळंबोली येथील देवांशी इन हॉटेलसमोरील पादचारी हरदेव याला ठोकर दिल्यानंतर चालक भरत सिंग ठाकूर तिथून पळाले. प्रादेशिक परिवहन विभागाचे सहाय्यक मोटार वाहन निरिक्षक अमोल शेलार यांनी याबाबत कायदेशीर तक्रार दिल्यावर एसटीचालक भरत सिंग याच्याविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.




**पनवेल :** विचुंबेमध्ये नव्याने रूही कलेक्शन हे कपड्यांचे दुकान सुरू झाले आहे. माजी सरपंच बळीराम पाटील यांच्या या दुकानाचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी झाले. त्यांनी बळीराम पाटील यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे तालुका चिटणीस यतीन पाटील, माजी सरपंच बळीराम पाटील, भरत पाटील, संतोष आसावळे, संतोष भगत, संदीप वाघमारे, आनंद घोंधळी, अनिल भोईर, संजय पाटील, विठ्ठल पाटील, अभय घोंधळी, ओंकार पाटील, दीपक माळी, अलंकार भगत, निलेश कांबळे, राज पाटील, विपुल पाटील, पांडुरंग गाताडे आदी उपस्थित होते.

## संपादकीय

# निवडणुकांची प्रतीक्षा

ओबीसी आरक्षणात घट होण्याची शक्यता आणि प्रभागरचनेसंदर्भातील पेचामधून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दीर्घ काळ रखडल्या आहेत. न्यायालयीन विलंबाचे कारण योग्य असले तरी, स्थानिक पातळीवरच्या कामांकरिता राज्यात काही ठिकाणच्या नागरिकांना जिल्हा किंवा तालुका मुख्यालय गाठावे लागत असल्याने या निवडणुका लवकरात लवकर व्हाव्यात अशी लोकांची इच्छा आहे.

**कोरोना साथीमुळे राज्यात तेव्हा होऊ घातलेल्या पालिका निवडणुका लांबणीवर पडल्या. तेव्हापासून गेली सुमारे तीन ते पाच वर्षे रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबतची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी मंगळवारी पार पडली. आता तरी निवडणुका घेण्याबाबत निकाल लागतो का, याविषयी तेव्हा राज्यात मोठी उत्सुकता होती. मात्र संबंधित सुनावणी ६ मेपर्यंत पुढे ढकलण्यात आल्याने या निवडणुका आता दिवाळीनंतरच होण्याची शक्यता वर्तवली जाते आहे. विदर्भातील पाच जिल्ह्यांमध्ये ओबीसी आरक्षणामुळे एकूण आरक्षणाबाबत घटनेने निश्चित केलेल्या ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन होत असल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण वगळण्याचे आदेश दिले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात हे आरक्षण लागू करण्यासाठी शास्त्रशुद्ध माहिती उपलब्ध न झाल्याने हा पेच कायम राहिला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओबीसी आरक्षणाच्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने २२ ऑक्टोबर २०२१ रोजी निकाल दिला. त्याला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात ३० नोव्हेंबर २०२१ रोजी दाखल झाली. तेव्हापासून सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण प्रलंबित असल्यामुळे राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांसह स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. मुंबई व ठाण्यातील महापालिकांमधील प्रशासकीय राजवटीला तीन वर्षे पूर्ण होत आली आहेत तर कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर, संभाजीनगर या मनपांचा कारभार प्रशासकांच्या हाती जाऊन पाच वर्षे झाली आहेत. राज्यातील सर्व २९ महानगरपालिकांमध्ये सध्या प्रशासकीय राजवट लागू आहे. काही ठराविक नगरपंचायती वगळता २३२ नगरपालिका, सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या प्रशासकांच्या ताब्यात आहेत. स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी सर्वसामान्य लोक नगरसेवकांकडे धाव घेत असतात. मतदारांप्रतीच्या उत्तरदायित्वामुळे आपल्या वॉर्डातील समस्यांची त्यांना माहिती असते. सध्या पाणी, कचरा, सांडपाणी किंवा स्थानिक रस्ते आदी प्रश्नांसंदर्भात दाद मागण्यासाठी कोणाकडे जावे याविषयी नागरिक गोंधळून जाताना दिसतात. लोकप्रतिनिधींचा अंकुश नसल्याने काही नोकरशहा मुजोरी करतात अशा तक्रारी दिसतात. प्रभागातील किरकोळ स्थानिक प्रश्न समजून घेण्याची नोकरशहांची तितकीशी मानसिकता नसते. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधून राजकीय नेतृत्वाची नवी फळी घडते. पण या निवडणुका रखडल्याने सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये काहिसे नैराश्य आहे. सत्तावीस टक्के ओबीसी आरक्षणाला आव्हान देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित याचिकांमुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा हा खोळंबा झाला आहे. यापूर्वी मध्य प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील ओबीसी आरक्षणाचा सर्वोच्च न्यायालयात पोहोचलेला मुद्दा निकाली लागून त्या राज्यामध्ये निवडणुका पार पडल्या आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा महाराष्ट्रासंदर्भातील निकालही लवकर लागेल अशी आशा आहे. मे महिन्यात सुनावणी होऊन लगेच निकाल लागला नाही तर मात्र न्यायालयाच्या सुट्टीनंतर सुनावणी पुढे जाऊन जुलै उजाडेल. मुंबईतील प्रभागरचनेचा मुद्दा निकालात निघाल्यावर राज्य निवडणूक आयोगाला निवडणुकीच्या तयारीसाठीही काही दिवस लागतील. त्यामुळेच या निवडणुकांना दिवाळीनंतर नोव्हेंबर-डिसेंबर उजाडू शकतो असे म्हटले जाते आहे.**

# वन्यजीव संवर्धन सजीवसृष्टीसाठी आवश्यक



वन्यजीव हे पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टीचा आधार आहेत. जेव्हा पृथ्वीवरून वन्यजीवांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट होईल, तेव्हा मानवी जीवनाचा अंत अतिशय वेदनादायक पद्धतीने होणार. वन्यजीवांमुळे जंगले समृद्ध होतात, जंगलांमुळे पाण्याचे स्रोत समृद्ध होतात, झाडे मातीची धूप रोखतात आणि सुपीक जमिनीचे संरक्षण करतात. सर्वांना शुद्ध पाणी आणि शुद्ध ऑक्सिजन मिळते, ऋतूचक्र व्यवस्थित चालते, वेळेवर पुरेसा पाऊस पडतो, हवामान आणि निसर्ग यांच्यात संतुलन राखले जाते, सर्व प्राण्यांची अन्नसाखळी सुरळीत चालते. मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी होतो. नैसर्गिक आपत्ती कमी होतात, पिके फुलतात, समाजातील प्रत्येक घटकाला पोषक तत्वांनी समृद्ध असलेले निरोगी अन्न मिळते. आजार कमी होतात, देश स्वावलंबी होतो, नैसर्गिक संसाधने समृद्ध होतात. देशातील दर्जेदार अन्नधान्य आणि उत्पादनांची निर्यात वाढून आयात कमी करण्यास मदत होते. मुबलक प्रमाणात उत्पादनामुळे महागाई कमी होते आणि अशुद्धता, भेसळ आणि घातक रसायनांचा वापर यासारख्या वाईट गोष्टी कमी होतात. मानवाचे राहणीमान सुधारते आणि अशा प्रकारे मानव आणि देश खऱ्या अर्थाने प्रगती करतात. जर आपण बारकाईने निरीक्षण केले तर मानवाचे संपूर्ण जीवन वन्यजीवांवर आधारित असल्याचे दिसून येते. मानव सतत निसर्गाचा नाश करत आहे, परंतु वन्यजीवांमुळेच मानवी जीवनाचे अस्तित्व टिकून आहे, कारण वन्यजीव हे जंगले आणि निसर्गाचे मुख्य रक्षक आहेत. या २०२५ वर्षीच्या जागतिक वन्यजीव दिनाची थीम वन्यजीव संवर्धन वित्त: लोक आणि ग्रहात गुंतवणूक आहे. वन्यजीव संवर्धन प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी शाश्वत आर्थिक उपायांची तातडीची गरज यावर ही थीम लक्ष केंद्रित करते; वन्यजीव संवर्धनाला चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण आर्थिक यंत्रणांची आवश्यकता आहे.

देशाच्या वाढत्या लोकसंख्येला सुखसोयी पुरविण्यासाठी मर्यादित नैसर्गिक संसाधनांवर अमर्याद दबाव आहे. आपण शहरांमधून सुंदर किलबिलाट करणारे पक्षी आधीच हाकलून लावले आहे. शहरे आता महानगरांचे रूप धारण करत आहेत, शहरांभोवतीची गावे, जंगले, शेतजमीन, पाण्याचे स्रोत, नैसर्गिक संसाधने झपाट्याने कमी होत आहेत. शहरे आणि महानगरांमधून वाहणाऱ्या नद्यांनी आता नाल्यांचे रूप धारण केले आहे; विषारी कचरा, ई-कचरा आणि जैव वैद्यकीय कचऱ्याचे प्रचंड डोंगर सतत वाढत आहेत. मानवी जीवनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक उत्पादनाचा कच्चा माल निसर्गाकडून मिळतो, नैसर्गिक संसाधनांच्या अतिरेकी वापरामुळे आपत्ती आणि प्राणघातक आजार सतत वाढत आहेत. लोकसंख्येनुसार शहरांमध्ये नवीन वस्त्या तयार होत आहेत, रस्त्यावर माणसांपेक्षा जास्त वाहने आहेत. पृथ्वीच्या तापमानात सतत बदल होत आहेत, मोठे हिमखंड वितळत आहेत. शहरे आणि गावांमध्ये भूजल पातळी सतत घसरत आहे, याचा थेट परिणाम पिकांवर होत आहे, तापमान वाढत आहे, अन्नधान्याची आयात वाढत आहे. प्रदूषण, गोंगाटा, आर्थिक असमानता आणि गुन्हेगारी वाढत आहे. जंगलातील वन्यजीवांना अन्न आणि पाण्यासाठी मानवी वस्तीत यावे लागते, त्यामुळे मानव आणि वन्यजीवांमधील संघर्ष वाढत आहे. आपण भावी पिढ्यांसाठी असलेल्या संसाधनांचाही वापर केला आहे. आपण निसर्गाकडून जे काही घेतो ते आपल्याला परत द्यावे लागते, पण आजच्या युगात स्वार्थी माणूस निसर्गाला पिळून त्याच्याकडून हिसकावून घेत आहे, माणूस निसर्गाच्या प्रत्येक भागात आपला वाटा निर्माण करत आहे.

वन्यजीव नेहमी मानवी हस्तक्षेपापासून दूर राहण्याचा प्रयंत्न करतात, परंतु मानवच सतत स्वताची व्याप्ती वाढवत आहे, वन्यजीवांना अन्न शोधणे आणि जगण्यासाठी स्पर्धा करणे कठीण बनवत आहे. मानवी चुकांचे परिणाम वन्य प्राण्यांना भोगावे लागतात; वन्यजीवांना त्यांच्या प्राणांचे बलिदान देऊन हवामान बदलाच्या परिणामांची सर्वात मोठी किंमत मोजावी लागते. मानवी प्रगतीमुळे वन्यजीवांचे थेट नुकसान होते, त्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होतात आणि प्रदूषणामुळे मृत्यू होतात. अनेक वेळा रस्ते अपघात, वीज कोसळणे, उघड्या खड्ड्यात किंवा शेताच्या विहिरीत बुडून वन्य प्राण्यांचा मृत्यू होतो. रस्त्यांचा विकास वाढत असताना, वेगवान वाहनांमुळे वन्य प्राण्यांच्या मृत्यूचा धोका वाढतो. वन्य प्राण्यांसाठी शिकार हा आणखी एक धोका आहे. वन्यजीवांमध्ये मृत्यूची इतर कारणे म्हणजे रोग, दुखापत, परजीवीवाद, उपासमार, कुपोषण, निर्जलीकरण, हवामान परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती आणि इतर प्राण्यांकडून होणारी शिकार. वाढत्या मानवी क्रियाकलापांमुळे तलाव, गवताळ प्रदेश आणि जंगले यांसारख्या अधिवासांचे नुकसान होते, ज्यामुळे वन्यजीवांना सहज वावरणे कठीण होते. परिसंस्थेत सतत बदल होत असतात, ज्यामुळे वन्यजीवांना अन्न, पाणी आणि त्यांच्या पिल्लांना वाढवण्यासाठी चांगल्या नैसर्गिक जागांपासून वंचित ठेवले जाते. प्रदूषणामुळे हवा, माती आणि पाणी दूषित होऊन जंगलांपर्यंत पोहोचते. वर्ल्ड वाइल्डलाइफ फंडच्या लिव्हिंग प्लॅनेट रिपोर्ट २०२४ नुसार, गेल्या ५० वर्षांत (१९७०-२०२०) वन्यजीवांच्या लोकसंख्येचा सरासरी आकार विनाशकारीरीत्या ७३ टक्क्यांनी कमी झाला आहे. अहवालात असा इशारा देण्यात आला आहे की नैसर्गिक विनाश आणि हवामान बदलामुळे पृथ्वीच्या काही भागांमध्ये धोकादायक पातळीला पोहोचत आहे, ज्यामुळे मानवतेसाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे.

गेल्या पाच वर्षांत महाराष्ट्रात ४१ वाघ आणि ५५ बिबट्यांची शिकार करण्यात आली. आरटीआय अर्जाद्वारे मिळवलेल्या माहितीनुसार, २०२० ते जानेवारी २०२५ दरम्यान राज्यात १६८ वाघ आणि ८०८ बिबट्यांचा मृत्यू झाला आहे. अधिकाऱ्यांनी म्हटले आहे की बहुतेक मृत्यू नैसर्गिक कारणांमुळे आणि अपघातांमुळे झाले आहेत, तरी शिकारीमुळे वाघांच्या मृत्यूची संख्या चिंतेचा विषय आहे. एका शिकारविरोधी तज्ज्ञाचे म्हणणे आहे की स्थानिक शिकारी या हत्यांमध्ये मोठी भूमिका बजावतात आणि ते पुढे म्हणतात की क्रूर टोळ्यांकडून होणाऱ्या संघटित शिकारीच्या ९० टक्क्यांहून अधिक घटनांची नोंदच केली जात नाही. २००२ ते २०२३ पर्यंत, महाराष्ट्राने ८६७ हेक्टर ओलसर प्राथमिक जंगल गमावले, जे १.२८ मेट्रिक टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनाच्या समतुल्य आहे. आदर्शपणे राज्यात ३३ टक्के वनक्षेत्र असायला हवे, परंतु सध्या ते फक्त १६.५३ टक्के आहे. इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट २०२३ नुसार, गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्रातील वनक्षेत्र सुमारे ५४.५ चौरस किलोमीटरने कमी झाले आहे.

अधिकृतपणे मान्यताप्राप्त स्त्रोतांकडून संकलित केलेल्या जागतिक बँकेच्या विकास निर्देशकांच्या संग्रहानुसार, २०२२ मध्ये भारतातील एकूण वनक्षेत्र ७२६९२८ चौरस किमी नोंदवले गेले. रिमोट सेन्सिंग सॅटेलाइट डेटा आणि फील्ड-बेस्ड इन्व्हेंटरीच्या व्याख्येवर आधारित फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाने तयार केलेल्या द्वैवार्षिक अहवालानुसार, २०२३ पर्यंत भारतातील एकूण वन आणि वृक्षाच्छादन ८,२७,३५७ चौरस किमी होते, जे देशाच्या भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे २५ टक्के व्यापते. भारताच्या राष्ट्रीय वन धोरणानुसार, पर्यावरणीय स्थिरता राखण्यासाठी जंगलाखालील एकूण भौगोलिक क्षेत्राचा आदर्श टक्केवारी किमान ३३ टक्के असणे आवश्यक आहे. आजच्या आधुनिक सुविधा, साधनसंपन्न समाज आणि सरकार असूनही, बुद्धिमान माणूस अनेक प्रसंगी कमकुवत आणि निराश होतो व आत्महत्या किंवा गुन्हा करतो. मग अशा परिस्थितीत जर वन्यजीवांना अन्न आणि पाण्याची गरज भागवण्यासाठीही संघर्ष करावा लागत असेल, तर त्यांची अवस्था किती वाईट असेल याची कल्पना आपण करू शकतो, अशा परिस्थितीत त्यांनी कुठे जावे, कसे जगावे?

**-डॉ. प्रितम भि. गेडाम**




## तुमचे व्हॉट्सप कोण वापरत आहे?

व्हॉट्सपची मूळ कंपनी मेटा संदेश आणि कॉलसाठी एंड-टू-एंड एन्क्रिप्शन सुनिश्चित करते, हॅकर्स किंवा अनधिकृत वापरकर्त्यांकडे तुमचे लॉगिन तपशील असल्यास ते तुमचे खाते ॲक्सेस करू शकतात. हे टाळण्यासाठी, जर तुमचे व्हॉट्सप खाते अनोळखी डिव्हाइसवर वापरले जात असले त्यांचा ॲक्सेस काढून टाकण्याचा एक सोपा मार्ग आहे.



तुमचे व्हॉट्सप कोण वापरत आहे?

व्हॉट्सप मध्ये एक बिल्ट-इन लिंक्ड डिव्हाइसेस फीचर आहे जे तुम्हाला तुमचे खाते कुठे लॉग इन केले आहे ते पाहण्याची परवानगी देते. जर तुम्हाला एखादे डिव्हाइस आढळले जे तुम्हाला माहित नाही, तर तुम्ही ते लगेच काढून टाकू शकता.

लिंक्ड डिव्हाइसेस फीचर म्हणजे काय?

व्हॉट्सप चे लिंक्ड डिव्हाइसेस फीचर तुम्हाला तुमचे व्हॉट्सप खाते तुमच्या फोन, संगणक किंवा टॅबलेटसह अनेक डिव्हाइसेसवर वापरण्याची परवानगी देते. तुम्ही एकाच वेळी चार डिव्हाइसेस तुमच्या प्राथमिक फोनशी लिंक करू शकता.

व्हॉट्सप मधून अज्ञात डिव्हाइसेस कसे काढायचे


स्टेप १: तुमच्या स्मार्टफोनवर व्हॉट्सप उघडा.

स्टेप २: वरच्या उजव्या कोपऱ्यात असलेल्या तीन-डॉट मेनूवर टॅप करा.स्टेप ३: मेनूमधून लिंक्ड डिव्हाइसेस निवडा. स्टेप ४:तुमचे व्हॉट्सप खाते सक्रिय असलेल्या सर्व डिव्हाइसेसची सूची पहा.स्टेप ५: अँड्रोइड् विंडोज किंवा ब्राउझर सत्रांसारखे डिव्हाइस तपशील तपासा.

स्टेप ६: अपरिचित डिव्हाइसेसवर टॅप करून आणि लॉग आउट निवडून ते काढून टाका.

तुमचे व्हॉट्सप खाते कसे सुरक्षित करावे? स्टेप १: सेटिंग्ज अकाऊंट टु स्टेप व्हेरिफिकेशन वर जा आणि अतिरिक्त सुरक्षिततेसाठी पिन सेट करा.स्टेप २: लिंक्ड डिव्हाइसेस अंतर्गत कोणतेही अज्ञात डिव्हाइस लॉग इन केलेले नाहीत याची खात्री करा आणि कोणतेही संशयास्पद डिव्हाइस काढून टाका.स्टेप ३: अज्ञात लिंक्सवर क्लिक करणे किंवा पडताळणी न केलेल्या संपर्कांसह वैयक्तिक माहिती शेअर करणे टाळा.स्टेप ४: व्हॉट्सप वर अनधिकृत प्रवेश रोखण्यासाठी एक मजबूत पासवर्ड, फिंगरप्रिंट लॉक किंवा फेस आयडी सेट करा.

# कर्णधार नरी कॉन्ट्रॅक्टर



**निमित्त**

नरिमन जमशेदजी कॉन्ट्रॅक्टर यांचे कुटुंब मुंबई येथे असूनही त्यांचा जन्म ७ मार्च १९३४ रोजी सध्याच्या गुजरातमधील गोध्रा येथे झाला. त्यांच्या जन्माची कहाणी रंजक आहे.कॉन्ट्रॅक्टरची आई दाहोदहून मुंबईला ट्रेनने प्रवास करत होती . तिला प्रसूती वेदना सुरू होताच, ट्रेनच्या ड्रायव्हरने, जो योगायोगाने तिचा भाऊ होता, गोध्रा येथे ट्रेन थांबवली जिथे तिने कॉन्ट्रॅक्टरला जन्म दिला.

१९५२ मध्ये प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पणात, कॉन्ट्रॅक्टरने जुळे शतके ठोकली, ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू आर्थर मॉरिसनंतर असे करणारा तो दुसराच खेळाडू होता. डिसेंबर १९५५ मध्ये, कॉन्ट्रॅक्टरने मुंबई येथे न्यूझीलंडविरुद्ध भारतीय संघासाठी पदार्पण केले. त्याने १६ धावा केल्या.

एक फलंदाज म्हणून, कॉन्ट्रॅक्टरचा सर्वात मोठा वारसा म्हणजे त्याने सातत्याने दाखवलेली लढाऊ वृत्ती.

पदार्पणाच्या चार वर्षांनंतर, १९५९ मध्ये भारताच्या इंग्लंड दौऱ्यातील दुसऱ्या सामन्यात, कॉन्ट्रॅक्टरला लॉर्ड्समध्ये बरगडी मोडली. तथापि, तो खेळत राहिला आणि फ्रेड ट्रूमन, ब्रायन स्टॅथम आणि ॲलन मॉस सारख्या खेळाडूंविरुद्ध ८१ धावा केल्या.

कदाचित लॉर्ड्समधील त्याच्या कामगिरीमुळेच कॉन्ट्रॅक्टरला कसोटी कर्णधारपद मिळाले. तो तेव्हा २६ वर्षांचा होता.

कर्णधार म्हणून त्यांचे पहिले काम १९६०-६१ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाचे नेतृत्व करणे होते पाचही सामने अनिर्णित राहिले.

त्याच वर्षी, कॉन्ट्रॅक्टरच्या संघाने पहिल्यांदाच दौऱ्यावर असलेल्या इंग्लंड संघाविरुद्ध मालिका जिंकून इतिहास रचला. भारताने पाच सामन्यांची मालिका २-० अशी जिंकली.एकूणच, त्यांनी नेतृत्व केलेल्या १२ कसोटी सामन्यांमध्ये भारताने प्रत्येकी दोन कसोटी जिंकल्या आणि दोन हरल्या.

१९६१-६२ च्या हंगामात भारताच्या वेस्ट इंडिज दौऱ्यादरम्यान, भारताने बार्बाडोसविरुद्ध स्थानिक सामना खेळला. तो कॉन्ट्रॅक्टरचा भारतीय जर्सीमधील शेवटचा सामना ठरला - वेगवान गोलंदाज चार्ली ग्रिफिथच्या चेंडूने भारतीय कर्णधाराला धक्का बसला. कॉन्ट्रॅक्टरने चेंडूला अडवला नाही. तो त्याच्या मागे जाऊन खेळला. त्याला कदाचित शॉर्ट-लेगच्या दिशेने तो दूर करायचा होता, पण तो किती उंचीवर उडेल हे त्याला कळत नव्हते, तो टाळण्यासाठी एका सेकंदाच्या हताश प्रयत्नात कंबरेपासून मागे वाकला आणि उजव्या कानाच्या अगदी वरच्या बाजूला लागला.

कंत्राटदार गंभीर जखमी झाला - त्याच्या कवटीत एक छिद्रित स्टीलची जाळी गेली - परंतु अनेक शस्त्रक्रियांनंतर त्याला धोक्यातून बाहेर काढण्यात आले. कॉन्ट्रॅक्टर त्याच्या दुखापतीतून धैर्याने सावरला. घटनेनंतर १० महिन्यांच्या आत, तो महाराष्ट्र मुख्यमंत्री एकादशकडून खेळला आणि ३७ धावा केल्या.

त्याला पुन्हा कधीही आंतरराष्ट्रीय सामना खेळण्याची संधी मिळाली नाही, ३५ वर्षांनंतर, माजी भारतीय कर्णधाराला जीवनगौरव सीके नायडू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# दररोज १० मिनिटे चालल्याने आयुष्य ७% वाढू शकते

जामा इंटरनॅशनल या वैद्यकीय जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, दररोज फक्त १० मिनिटे चालल्याने आयुर्मान अनेक वर्षांनी वाढू शकते. एखादी व्यक्ती दररोज फक्त १० मिनिटे वेगाने चालत असेल तर अकाली मृत्यूचा धोका ७% ने कमी होऊ शकतो. जर चालण्याचा वेळ २० मिनिटांपर्यंत वाढवला तर अकाली मृत्यूचा धोका १३% ने कमी होऊ शकतो. जर ते ३० मिनिटांपर्यंत वाढवले तर अकाली मृत्यूचा धोका १७% कमी होऊ शकतो. याचा अर्थ असा की जलद चालण्यामुळे अकाली मृत्यूचा धोका कमी होतो.



हार्वर्ड मेडिकल स्कूलच्या एका अभ्यासानुसार, दिवसातून फक्त ३० मिनिटे चालल्याने हृदयरोगाचा धोका १९% कमी होऊ शकतो. त्याच वेळी, जर्मन आरोग्य संस्था, रॉबर्ट कोच इन्स्टिट्यूटच्या अभ्यासानुसार, जेवणानंतर १५ मिनिटे चालणे शरीर आणि मन दोन्ही निरोगी ठेवते. यामुळे रक्तातील साखरेची पातळी देखील नियंत्रणात राहते. यामुळे टाइप-२ मधुमेहाचा धोका कमी होतो. एकंदरीत, चालणे खूप फायदेशीर आहे.

डॉ. दीपक गुप्ता यांच्या मते, जर तुम्ही दररोज सकाळी व्यायामासाठी अर्धा तास काढू शकत नसाल तर काळजी करण्याची गरज नाही. दिवसभरात फक्त १०-१५ मिनिटे जलद चालणे देखील खूप फायदेशीर आहे. यामुळे पचनसंस्था सुधारते आणि लठ्ठपणा कमी होतो.

दररोज काही मिनिटे वेगाने चालल्याने रक्ताभिसरण सुधारते. हे रक्तदाब आणि रक्तातील साखर नियंत्रित करण्यास मदत करते. जर रक्तातील साखरेची पातळी आणि रक्तदाब नियंत्रणात असेल तर हृदयाचे आरोग्य देखील सुधारते.

आजकाल लोकांचे जीवन इतके धावपळीचे झाले आहे की त्यांच्या आरोग्यासाठी काही मिनिटेही काढणे कठीण झाले आहे. तथापि, डॉ. दीपक गुप्ता म्हणतात की जर आपण थोडे प्रयत्न केले तर आपण स्वतःसाठी काही मिनिटे काढून फिरायला जाऊ शकतो. यासाठी कोणतेही कठोर परिश्रम करावे लागत नाहीत आणि त्यासाठी कोणताही खर्चही येत नाही. साधारणपणे, १ तासात ५-६ किलोमीटर वेगाने चालणे हे जलद चालणे मानले जाते. जर तुम्ही प्रति मिनिट सुमारे १०० पावले चालत असाल, तर तुमचा वेग जलद चालण्यासाठी योग्य आहे.

# नियोजित डम्पिंग ग्राउंडविरोधात लवजी ग्रामस्थांचा मोर्चा

**खोपोली , खालापुर : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१ मधील लवजी ग्रामस्थांच्या २० एकर जागेवर डम्पिंग ग्राउंड आरक्षित केल्याने, लवजी व परिसरातील ग्रामस्थांनी एकत्र येत डम्पिंग हटाव मोहीम सुरू केली आहे. यासंदर्भात ६ मार्च ला ग्रामस्थांनी नगरपरिषदेवर निषेध मोर्चा नेऊन डम्पिंग ग्राउंड विरोधात ग्रामस्थांची भूमिका असल्याचे मुख्याधिकारी पंकज पाटील यांना निवेदन देऊन सांगितले.

नगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक एक लवजी व परिसरातील जागेवर डम्पिंग आरक्षित केल्याने या भागातील ग्रामस्थ संतप्त झाले आहेत , या संदर्भात ग्रामस्थांनी दोन मार्चला ग्रामसभा घेऊन डम्पिंगला विरोध असल्याचा एकमुखी ठराव केला होता. या परिसरात शाळा, मंदिरे ,पर्यटन स्थळे ,असतानाही नगर रचना विभागाने या भागात डम्पिंग आरक्षित केल्यामागे काय (अर्थ) कारण आहे असा सवाल ग्रामस्थांनी नगरपरिषद प्रशासनाला विचारला आहे. डम्पिंगच्या २० एकर जागेवर बहुतांश लवजी शेतकऱ्यांच्या जागा आहेत. गेल्या पंचवीस वर्षापासून या जागेवर ग्रीन झोन आहे आणि अलीकडेच या जागेवरील ग्रीन झोन उठवण्यात आले असून त्या जागी निवासी झोन करण्यात आल्याने शेतकरी आनंदित होते परंतु अचानक डम्पिंग चे आरक्षण पडल्याने येथील ग्रामस्थांची झोपच उडाली. आणि ग्रामस्थांनी या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा निर्धार ग्रामसभेत केला.

नियोजित डम्पिंग ग्राउंड् जवळ महेंद्र कंपनीची जेसीएमएम शाळा गेली पन्नास वर्ष शैक्षणिक कार्य करीत आहे. या डम्पिंग मुळे शाळा बंद होण्याच्या भीतीने पालकांमध्येही त्याचप्रमाणे ग्रामस्थांमध्येही संतापाची लाट उसळली आहे. लवजी गावाचे रेल्वे स्थानक कर्जत खोपोली मार्गावर आहे, खोपोली शहरानंतर मोठ्या प्रमाणात या भागात झपाट्याने हा भाग विकसित होत आहे. मुंबईकरांनी व पुणे करांनी सेकंड मुंबई म्हणून या भागात फ्लॅट खरेदी केले आहे, डम्पिंग ग्राउंड मुळे त्यांच्या स्वप्नांचा चकाचूर होणार आहे. नगर रचना विभागाने तात्काळ डम्पिंग रद्द करावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येतील यापेक्षा सर्व ग्रामस्थ नगरपरिषदेसमोर आमरण उपोषणा बसणार असल्याचे समीर शिंदे व किशोर पाटील यांनी यावेळी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

हरकतीचे निवेदन मुख्याधिकारी पंकज पाटील यांना देण्यासाठी ग्रामस्थ नगरपरिषदेवर धडकले, मुख्याधिकारी पाटील यांनी शिष्टमंडळा भेटण्यासाठी वेळही दिला, परंतु आपण आपल्या दालनातच निवेदन स्वीकारून अशी भूमिका घेतल्याने आंदोलन आक्रमक झाले आणि महिलांसह सर्व तरुण वृद्ध चक्क उन्हामध्ये ठिय्या आंदोलन केले, अखेर त्या ठिकाणी असणाऱ्या माजी लोकप्रतिनिधींनी सांगितले त्यानंतर मुख्याधिकारी यांनी आंदोलकांना भेटून निवेदन स्वीकारले. यावेळी ग्रामस्थांची भूमिका समीर शिंदे यांनी मुख्याधिकारी यांना समजावून सांगितली. कुठल्याही परिस्थितीत डंपिंग ग्राउंड चा आरक्षण उठवण्यात यावं अन्यथा तीव्र आंदोलनाला प्रशासनाला सामोर जावे लागेल असा इशारापण दिला.




# अलिबाग–मुरूड मार्गावरील वाहतूक झाडीच्या विळख्यात



## धोकादायक झुडपे आणि फांद्या छाटून टाकण्याची मागणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग ते मुरूड मुख्यःरस्त्यावरील वाहतुक अवास्तव वाढलेल्या झाडीच्या विळख्यात असून या अवास्तव वाढलेल्या झाडीने मोठया वाहनाच्या वाहतुकीस नित्याने अडथळा असतो. त्यामुळे छोटे अपघात ही घडत आहेत.त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याने हि झुडपे व फांद्या तोडुन टाकण्याची मागणी वाहन चालक व प्रवासी करीत आहेत.

अलिबाग व मुरूड तालुक्यातील वाहतुकीत झालेली वाढ, यामुळे वाहनांची संख्या वाढलेली असून मिनिटागणीत वाहतुक या मुख्यःरस्ताने सुरू असते. अलिबाग, नागाव ते रेवदंडा परिसरात मुख्यः रस्त्याच्या दुर्तफा बागायती आहेत, या बागायती मधील अनेक झाडे मुख्यः रस्तावर अवास्तवपणे वाढलेली आहेत. या अवास्तव वाढलेल्या झाडाने एकाच ठिकाणाहून दोन मोठी वाहने पास होताना, अडथळा येतो. तसेच अनेक झाडाच्या फांदया रस्तावर येत असल्याने मोठया वाहनांना झाडांना चुकविताना मोठा प्रयास करावा लागतो.

तसेच मुरूड तालुक्यातील मुख्यः रस्ताला सुध्दा असेच अवास्तव वृक्ष ठिकठिकाणी वाढलेले दिसून येतात. विशेषतः रेवदंडा–साळाव पुला अगोदर दोन्ही बाजूकडील मुख्यःरस्तात अशीच अवास्तव वाढलेले वृक्ष मुख्यः रस्ताला मोकाट पसरलेली आहेत. येथून सुध्दा मोठया वाहनांना जा–ये करताना कसरत करावी लागते. अवास्तव वाढलेल्या वृक्षाच्या फांदया खुपच खालवर मुख्यः रस्ताला अगदी मधोमध आलेल्या आहेत. अनेकदा मोठया वाहनांना येथून प्रवास करताना अडथळा निर्माण होत असतो.

मुख्यः रस्त्याला वाढलेली अवास्तव वृक्षासोबत अलिबाग ते मुरूड मुख्यः रस्ताच्या साईड पट्टावर सुध्दा झाडी झुडपी मोकाटपणे वाढलेली दिसतात, ही अवास्तव वाढलेली झाडी झुडपी अगोंदच अरूंद असलेला रस्ता आणखीनच अरूंद बनवितात, त्यामुळे बाहेरील येणारी वाहनांचे वाहन चालक रस्ताच्या कडेला वाहने नेण्यास घाबरतात. त्यामुळे दोन मोठया गाडया पास होताना, या अवास्तव वाढलेल्या झाडी झुडपाने अथडळा निर्माण होतो.

अलिबाग ते मुरूड वाढते पर्यटन व स्थानिक स्तरावरील वाढते उदयोग व्यवसाय यामुळे येथील वाहतुकीस मोठी वाढ झालेली दिसून येते. या रस्ताने मिनिटागणीत वाहतुक सुरू असते. संबधीतानी अलिबाग ते मुरूड मुख्यः रस्त्याच्या दुर्तफा वाढलेली अवास्तव वृक्ष तसेच साईड पट्टीवर आलेली अवास्तव झाडी झुडपी यांची तोड करून मुख्यः रस्ता वाहतुकीस मोकळा ठेवावा अशी सर्व स्तरातून विशेषतः वाहन चालक व प्रवासीवर्गाकडून केली जात आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** Specification.

| | |
|---|---|
| Tender No. : E-Tender -02/ 2025-26<br>**Name of Tender :** E-Tender for Hiring of one no. of light motor vehicle (LMV) for the office of the Executive Engineer, Major Stores, Panvel for Financial Year 2025-26.<br>**Tender Fee :- Rs. 500/- + applicable GST**<br>**RFx No.- 7000035642** | **Online Downloading the RFx :** Dt.07.03.2025, 00:00 Hrs. to 21.03.2025, 23:59 Hrs.<br>**Online Submission of the RFx :** On or Before Dt. 21.03.2025, 23:59 Hrs.<br>**Online Opening of the Techno Commercial RFx :** Dt. 22.03.2025, at 10:00 Hrs. (If possible ).<br>**Online Opening of the Price bid:** Dt. 22.03.2025 at 15:00 Hrs. (If possible) |

For further details visit our website :-**https://srmetender.mahatransco.in**
Contact Person: - The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer, Major Stores, Panvel**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/E-Tender-02/2025-26 Dtd.07.03.2025 RFX No. **7000035626** | **Sub.:**-Invitation of SRM E-Tender for AMC of Air Conditioners at various substations under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2025-26. | Rs. 7,50,000/- (Including GST+ 1% Labour CESS) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/E-Tender-03/2025-26 Dtd. 07.03.2025 **RFx No. –7000035632** | **Sub:-**Invitation of SRM E-Tender for providing various consumables items for maintenance work at various Substation under EHV (O&M) Division Mahad for the year 2025-26. | Rs.8,45,113/- including GST |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 07.03.2025 @ 00:00 hrs to 21.03.2025 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**



महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)

**महाराष्ट्र सागरी मंडळ**

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई– ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२–६९०४१७७७ फॅक्स क्र. ०२२–६९०४१७४०
Website: https://mahammb maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in/ceommb@gmail.com

**ई – निविदा सूचना (सन २०२४–२५) ६९/५०/६४/६२/६३/६१/५४**

Main Portal: https://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांचे मार्फत योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी–१ नमुन्यात ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | को–या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत शिर्की अंतर्गत अंबावाडी येथे जेट्टी बांधणे, ता. पेण जि. रायगड. | ५०,८०,०८२/– | ५१,०००/– | १,१८०/– | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| २ | करंजा रो–रो जेट्टी ता. उरण जि. रायगड येथील विद्युतीकरण कामाची दुरूस्ती करणे. | ६८,००,४५२/– | ६८,५००/– | १,१८०/– | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ३ | रेवस कोळीवाडा ता. अलिबाग जि. रायगड येथील जेट्टीचे रुंदीकरण करणे व संरक्षण भिंत बांधणे. | ५,५२,८५,८५०/– | २,७६,५००/– | ३,५४०/– | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ४ | आरावी, ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे जेट्टी बांधणे. | ५,७७,५१,३७७/– | २,८९,०००/– | ३,५४०/– | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ५ | नवेदर नवगाव येथील जेट्टीची दुरूस्ती करणे, ता. अलिबाग जि. रायगड. | ६,३१,४६,८४७/– | ३,१६,०००/– | ३,५४०/– | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ६ | कोंडीवली, ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे जेट्टीचे बांधकाम करणे, | ६,३२,१९,९१९/– | ३,१६,५००/– | ३,५४०/– | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ७ | राजबंदर जेट्टी ते एलिफंटा लेणी पर्यंतचा रस्ता व संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे, ता. उरण जि. रायगड, | १२,३४,५०,४०७/– | ६,१७,५००/– | ३,५४०/– | १८ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई–निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १०.०३.२०२५ रोजी १५:०० वा. पासुन ते १८.०३.२०२५ रोजी १७.०० पर्यंत उपलब्ध असतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**सही/–**
**कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.**

आरओसी–२०२४–२५/क्र–५/C६८९९



Rayat Shikshan Sanstha's

**MODERN SCHOOL & JR. COLLEGE, VASHI**

**Sector No. 7, Vashi, Navi Mumbai, Tal. Thane, 400703, Tel. (022) 27821346, E-mail : modernschool1978@gmail.com**

**STAFF REQUIREMENT 2025-2026**

**Interview Date - 26/03/2025 (Wednesday) Time 10.00 am to 04.00 pm Venue - Modern School Vashi, Sec.07, Navi Mumbai**

| Sr. No | Name of the Post Qualification | Qualification | No. of Post | S.C | S.T | N.T. A | N.T. B | N.T. C | N.T. D | S.B.C. | O.B.C. | E.W.S. | SEBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 13% | 7% | 3% | 2.5% | 3.5% | 2% | 2% | 19% | 10% | 10% | 28% | 100% |
| 1 | **Principal** | M.A./B.Sc./B.Ed./M.Ed. (From a Recognized University) (8 Years experience of teaching secondary classes up to Std. X and 3Years experience in admin) | **1** | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | **1** |
| 2 | **Pre-Primary (Nursery to Sr.KG.)** | B.A./B.Sc./B.com/H.S.C. Montessori/ E.C.C. Ed. P.T.C | **6** | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | **6** |
| 3 | **Teachers 1st to 4th** | D.Ed./B.A. B.Ed./B.Sc. B.Ed./B.Com. B.Ed./ M.Ed. (From a Recognized University) | **23** | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 2 | 2 | 7 | **23** |
| 4 | **Teachers 5th to 10th** | B.A.B.Ed./B.Sc. B.Ed./ B.Com.B.Ed M.A. B.Ed/ M.Sc. B.Ed/M.com, B.Ed./M.Ed. (From a Recognized University) | **40** | 5 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 8 | 4 | 4 | 11 | **40** |
| 5 | **Teachers 11th to 12th (Self- Finance)** | M.A.B.Ed./M.Sc.B.Ed/ M.Com.B.Ed. (From a Recognized University) | **6** | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | **6** |
| 6 | **Music Teacher** | Sangeet Visharad | **3** | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | **3** |
| 7 | **Computer Teacher** | B.Sc(IT/CS)/M.Sc.(IT/CS), BCA/MCA | **4** | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | **4** |
| | | **Total** | **83** | **12** | **5** | **2** | **2** | **2** | **1** | **1** | **16** | **9** | **8** | **25** | **83** |

**Subject Wise Requirement For Secondary Section :-**
**English , Maths , Science, Computer.**

**Subject Wise Requirement For Primary Section:-**
**English, Maths, P.T.**

**Subject Wise Requirement For Higher Secondary Section : -**
**English**

1) Candidates having excellent subject knowledge and D.Ed./B.Ed Degree From Recognized University only need to apply.
2) Application forms are to be taken from the school office from **08/03/2025 to 22/03/2025 Time 11.00 am to 05.00 pm.** Application form fee Rs.100/-
3) Last day to submit your CV along with photo copy of your documents and cover letter in the office on **22/03/2025 time 11.00 am to 5.00 pm.**
4) Kindly email your CV to **modernschool1978@gmail.com** from the date of this advertisement untill **22/03/2025**
5) Experienced Teachers will be given first preference.
6) The School is purely non granted.
7) The post are purely temporary.
8) Originals will be verified at the time of interview, Documents should be self attested.
9) Walk-in Interview Candidate form will be accepted on the date of interview **(26/03/2025) till 11.00 am.** Only

Secretary
**Rayat Shikshan Sanstha , Satara**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे – वाजे ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| वाजे | सागर यशवंत वाघमारे | १४३ | – | ०–२८–१०<br>०–००–०० | १.८७ |
| | | | | एकूण –०–२८–१० | |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

ता. ०६/०३/२०२५
पनवेल

**सही/–**
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**

ऑफिस नं १३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी **मौजे कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड** येथिल पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत हि **१) श्री. शशिकांत भिमराव कदम, २) श्री. मंगेश भिमराव कदम आणि ३) श्री. सतीश भिमराव कदम** यांच्या मालकीची आहे, सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी सदर मिळकत हि **मे. साई क्रिपा भागीदार संस्था** यांना विकसनास देण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोयनावेळे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| गट क्र. व उपविभाग | भूधारणा पध्दती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| 6/2 | वर्ग-1 | जिरायत 0-88-20<br>पो.ख. 0-03-80<br>**एकूण 0-92-00** | 7.00 |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर त्याचे कोणत्याही भागावर कुणाही ति–हाईतांचे गहाण–दान, बक्षिस, फरोक्त, कराररनामा, एम.ओ.यू. हुकुमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेहि हक्क–हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

**पनवेल**
**दि.: ०६/०३/२०२४**

**सही/–**
**श्री. योगेश स. बाष्टे,**
**(ॲडव्होकेट)**
पत्ता : ऑफिस क्र. ७, तळमजला,
जयनारायण को. हौ. सो. लि., गावदेवी
मंदिराजवळ पनवेल, जि. रायगड ४१० २०६
मो. नं. ८८९८१२१९७१

प्रोसेस जमा ता.

मा. गुन्नाल सो
ॲड. इर्शाद शेख पनवेल
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर यांचे कोर्टत.....**

C.mA. १७६३/२०२४
दि.चौ. अर्ज क्र. १७६३/२०२४
नि ६/ड
ने.ता. १५/४/२०२५

१) सायरा अनवर शेख,
वय– ५८ वर्षे, धंदा– गृहिणी,
२) मोहसिन अन्वर शेख, वय– ३९ वर्षे, धंदा– नोकरी
३) फरीद अनवर शेख, वय– ३७ वर्षे, धंदा– नोकरी
४) इमरान अनवर शेख, वय– ३३ वर्षे, धंदा– नोकरी
सर्व रा. एमएफआय हाऊस, प्लॉट नं. बी–२४ सेक्टर ७, पिल्लई ग्लोबलः ॲकॅडमीजवळ, खांदा कॉलनी, नविन पनवेल (प), . ता. पनवेल, जि. रायगड,
**अर्जदार**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील पै. अनवर उस्मान शेख हे दिनांक ०८/०६/२०२० रोजी कुवेत येथे पैगंबरवासी झाले आहेत. पै. अनवर उस्मान शेख यांचे वडील पै. उस्मान शेख हे दि. ०५/०६/१९६७ रोजी पैगंबरवासी झाले आहेत. पै. अनवर उस्मान शेख यांची आई पै. अमिनाबी उस्मान शेख या देखील दि. १४/०८/२००६ रोजी पैगंबरवासी झाल्या आहेत. पै. अनवर उस्मान शेख यांचे मृत्युपश्चात त्यांना मुस्लिम कायद्यांतील तरतुदींनुसार अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

सायरा अनवर शेख, वगैरे हयांनी पै. अनवर उस्मान शेख यांच्या वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

पै. अनवर उस्मान शेख यांचे नावे असलेल्या स्थांवर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मौजे–नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सेक्टर १ मधील प्लॉट नं. १९ वर बांधण्यात आलेल्या माऊली को. ऑप. हौ. सोसायटी या इमारतीचे तिस–या मजल्यावरील निवासी सदनिका कं. बी–३०२, क्षेत्र ४८८. ७६ चौ. फुट कारपेट अशा वर्णनाची मिळकत.

वर नमुद मिळकतींमध्ये पै. अनवर उस्मान शेख यांचे मृत्यूपश्चात अर्जदार यांचा अविभक्त हिस्सा आहे.

वर सायरा अनवर शेख वगैरे हे पै. अनवर उस्मान शेख यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट सायरा अनवर शेख वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर पै. अनवर उस्मान शेख यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ६/३/२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्या निशी दिली.

**सही/–**
**लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

शिक्का

**सही/–**
**सहा. अधीक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# अनधिकृत बांधकामांवर हातोडा

## कोपरखैरणेत निष्कासनाची कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महापालिका विभागामार्फत अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे विभागात निष्कासनाची कारवाई केलं

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभाग अंतर्गत एस एस टाईप, रूम नंबर २००, सेक्टर १७, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास नोटीस बजावण्यात आली होती. या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात असून, दंडात्मक शुल्क १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. एस एस टाईप, रूम नंबर २०१, सेक्टर १७, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास नोटीस बजावण्यात आली होती. या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात असून, दंडात्मक शुल्क १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. एस एस टाईप, रूम नंबर २०२, सेक्टर १७, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्या बांधकामास नोटीस बजावण्यात आली होती. या बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात असून, दंडात्मक शुल्क १० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच रूम नंबर ९३२, सेक्टर ४, कोपरखैरणे नवी मुंबई. रूमच्या मागील बाजूस जागा बंदिस्त करून भिंत बांधण्यात आलेली होती. भिंत निष्काशीत करण्यात आली.

कोपरखैरणे शिवमंदिर, पावणे गाव या ठिकाणी पदपथावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाई करुन त्यांचे साहित्य जप्त करुन कोपरखैरणे क्षेपणभूमी या ठिकाणी जमा करण्यात आले. या अनधिकृत बांधकामावर कोपरखैरणे विभागामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते.

## घणसोलीत बेकायदा बांधकाम तोडले

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालय घणसोली अंतर्गत माँ शेरावाली बंगल्यासमोर, गोठीवलीगाव, नवी मुंबई यांचे आरसीसी तळमजला पुर्ण् + १ मजल्याचे काम प्रगतीपथावर होते. नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरू केले होते.



या अनधिकृत बांधकामास घणसोली विभागामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते, परंतू त्यांनी सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई महानगरपालिकेकडून तोडक मोहिमेचे आयोजन करण्यात आलेले होते. या धडक मोहिमेसाठी घणसोली विभागाचे सहाय्यक आयुक्त विष्णु धनावडे, कनिष्ठ अभियंता रोहित ठाकरे व इतर अधिकारी/ कर्मचारी, पोलीस पथक तैनात होते. त्यानुसार सदरील अनधिकृत बांधकाम हटविणेपोटी पाच कामगार, एक ब्रेकर व एक जेसीबी यांचा वापर करण्यात आला. यापुढेदेखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## नेरूळ विभागातील अतिक्रमण हटवले



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने नेरूळ विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरूळ विभागात अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामधारकांना अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये दि. १७ फेब्रुवारी २०२५ व ३ मार्च २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती. तथापी नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही.

अनधिकृत बांधकाम निष्कासन मोहिमेचे आयोजन करून अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे. या कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी सागर मोरे, कनिष्ठ अभियंता संजय सोनटक्के व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, १० मजुर, २ ब्रेकर व एक गॅसकटरच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे.

# पनवेलच्या पाणी नियोजनाचा मुद्दा अर्थसंकल्पीय अधिवेशनात

## आमदार विक्रांत पाटील यांनी वेधले लक्ष

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार विक्रांत पाटील यांनी पनवेल शहरातील पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित केला. पनवेल हे लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून झपाट्याने वाढणारे शहर असून, येथे मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रातील विविध भागांतून नागरिक रोजगार व उदरनिर्वाहाच्या निमित्ताने स्थलांतरित होत आहेत.

सध्या पनवेल शहरात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी प्रकल्प, वसई–विरार कॉरिडॉर यांसारख्या महत्त्वाच्या विकास प्रकल्पांचे काम सुरू आहे. तसेच, अनेक खासगी कंपन्यांचे उद्योग प्रकल्प येथे उभे राहत आहेत. त्यामुळे पनवेल शहराची लोकसंख्या गेल्या १० वर्षांत तब्बल १९४ टक्के वाढली आहे, मात्र शहराच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीसोबतच पाणीपुरवठ्याची समस्या गंभीर बनली आहे.

सध्याच्या घडीला पनवेल शहराला २२० एमएलडी (मिलियन लिटर प्रति दिवस) पाणीपुरवठा होतो, मात्र शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार २५० एमएलडी पाण्याची गरज आहे. यामुळे ३० एमएलडी पाण्याची कमतरता निर्माण झाली आहे, जी भविष्यात गंभीर पाणीटंचाईच्या संकटाला आमंत्रण देऊ शकते. शहरातील या पाणीटंचाईवर उपाययोजना म्हणून हेटवणे आणि मोरबे धरणांतून अनुक्रमे ७७ आणि ४० MLD पाणीपुरवठा होत आहे, तो काही प्रमाणात वाढवला गेला, तर सध्याचा पाणीटंचाईचा प्रश्न सुटू शकतो, असे आमदार विक्रांत पाटील यांनी सभागृहात स्पष्ट केले. तसेच, भविष्यात वाढणाऱ्या पाण्याच्या मागणीचा विचार करून सरकारने योग्य पाणीपुरवठा नियोजन व उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी त्यांनी अधिवेशनात केली.

### सरकारकडून उच्चस्तरीय बैठकीचे आश्वासन

यावर उत्तर देताना जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी आश्वासन दिले की, पुढील दोन वर्षांत बालगंगा, कोस्हिर आणि शिलार या धरणांच्या माध्यमातून पनवेल शहराला १०० टक्के आवश्यक पाणीपुरवठा करण्यात येईल. तसेच, सध्याच्या ३० टक्के पाणीटंचाईच्या समस्येवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी लवकरच उच्चस्तरीय बैठक बोलावली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# 'महिला सुरक्षित होणे काळाची गरज'

**नवी मुंबई : बातमीदार**

महिला दिन दरवर्षीप्रमाणेच साजरा होतो पण स्त्री अत्याचार काही कमी होत नाहीत. महिला सुरक्षित होणे काळाची गरज आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिका वृषाली मगदूम यांनी केले. नेरुळ सिवुड येथिल 'सेवाधारी जेष्ठ नागरिक संघ' सेक्टर ४८ येथे नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ नवी मुंबई आयोजित 'महिला दिन' साजरा झाला या वेळी त्या बोलत होत्या.

नवरंग मंडळाच्या सदस्या कल्पना मुनघाटे यांनी मंगेश पाडगावकर यांच्या पत्नीच्या पुस्तकाचे विवेचन सादर केले. नवरंग सदस्या दुर्गा देशमुख यांनी स्त्री व्यथा सांगणारी कथा सादर केली. प्रमुख पाहुण्या विनिता हिंगे नागपुर यांनी समस्त स्त्री विश्वाची वेदना आपल्या मनोगतात व्यक्त केली. नवरंग सदस्या पाकिजा आत्तार यांनी नवरंग साहित्य मंडळाची दिड वर्षाची कारकिर्द सांगितली. सेवाधारी नागरिक संघाच्या जाधवबाई यांनी समूहनृत्य सादर केले.

मंडळ अध्यक्ष गज आनन म्हात्रे यांनी नवरंग साहित्य मंडळाचे भावी उपक्रम विशद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगळा उदामळे यांनी केले. या वेळी नवरंग मंडळाने सर्व प्रेक्षकांना नामनिर्देशित पेन भेट दिले. राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# राष्ट्रीय स्तरावरील खेळांमध्ये पनवेल मनपाच्या अग्निशमन जवानांचे सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी दिल्ली त्यागराज स्टेडियम येथे ऑल इंडिया नॅशनल फायर सर्व्हिस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्डाच्यावतीने तिसऱ्या ऑल इंडिया इंडिया फायर सर्व्हिसेस स्पोर्ट्स ॲण्ड फायर सर्व्हिसेस मीट २०२५ मध्ये आयोजीत करण्यात आलेल्या विविध राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांमध्ये महापालिकेच्या अग्निशमन दलातील महिला व पुरूषांनी घवघवीत यश मिळवले आहे.

थाळीफेक व गोळा फेक या दोन्ही खेळामध्ये पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलातील महिला अग्निशामक शुभांगी घुले यांना सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे. याच बरोबर अग्निशामक आकाश नलवडे व तेजश्री साळुंखे यांनी बॅडमिंटन मिश्र दुहेरी प्रकारात कांस्य पदक टकाविले आहे. व एकेरी बॅडमेंटन प्रकारात कास्य पदक पटकावले. अग्निशामक चंद्रकांत मेणसे यांनी स्टेअर रेस फुल फायर फायटर स्पर्धांमध्ये (३५ मजली इमारती चढणे) कांस्य पदक मिळविले.

तसेच पै. प्रदिप सावंत यांनी कुस्तीच्या उपांत्य फेरीपर्यंत धडक मारली.याबरोबरच कृष्णा नरवटे व रामदास तिरवड यांनी अनुक्रमे २०० मीटर व १०० मीटर स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

महापालिकेच्या अग्निशामकांनी मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते सर्व विजेत्या अग्निशामकांचा आज सत्कार करण्यात आला. आयुक्त मंगेश चितळे व उपायुक्त कैलास गावडे, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी व सर्व अधिकारी वर्गाने त्यांचे अभिनंदन केले. तसेच पुढील होणाऱ्या स्पर्धकांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. पनवेल महापालिकेच्या वतीने अग्निशामकांची भरती झाल्यानंतर मिळालेले हे पहिले मोठे यश आहे.

# पनवेल मनपाचा आजपासून हिरकणी महोत्सव; विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने ७ मार्च रोजी पनवेल जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने भव्य स्वरूपातील नाविन्यपूर्ण असा महिलांचा सन्मान करण्यासाठी हिरकणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. बचत गटाच्या महिलांना उद्योग व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी २५ बचत गटांचे स्टॉल्स ७, ८, ९ मार्च असे तीन दिवस असणार आहेत.

महिलांच्या आरोग्याची काळजी घेत पनवेल महानगरपालिकेने विशेष अशा आरोग्य शिबीराचे आयोजन केले आहे. या आरोग्य शिबीरामध्ये मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगाची पॅप स्मिअर अशा विविध चाचण्या करण्यात येणार आहेत.

या महोत्सवासाठी प्रमुख अतिथी म्हणून राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, नगर विकास राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसाळ, आमदार डॉ.मनीषा कायंदे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे. विशेष आकर्षण महिलांसाठी फिटनेस फंडा सिने अभिनेत्री भार्गवी चिरमुले या देखील उपस्थित राहणार आहेत.

याबरोबरच महिलांसाठी स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी स्वयंसिद्धाच्या संचालिका, राष्ट्रीय पारितोषक विजेत्या तपस्वी गोंधळी आणि त्यांचे सहकारी प्रात्यक्षिक सादर करणार आहेत. सायबर फसवणूक आणि त्यापासून बचाव या विषयी मार्गदर्शन होणार आहे. दुपारच्या सत्रामध्ये खेळ पैठणीचा हा महिलांसाठीचा लोकप्रिय कार्यक्रम सादर होईल. या कार्यक्रमात तीन विजेत्या महिलांना पैठणीची विशेष भेट देण्यात येईल.

या आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे व अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त रविकिरण घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या हिरकणी महोत्सव कार्यक्रमाचा लाभ पनवेल महापालिका हद्दीतील महिलांनी घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त स्मिता काळे यांनी केले आहे.

# आत्मीयता पुस्तकाचे प्रकाशन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

खारघर इथल्या मी मराठी माझी मराठी मंडळाद्वारा आयोजित आत्मीयता पुस्तकाचे प्रकाशन व्याख्यात्या कांचन पालव व स्थानिक माजी नगरसेवक अजय बिहिरा यांच्या हस्ते नुकतेच खारघर येथे झाले. अभिजात मराठीचे पहिले वर्ष असल्याने मंडळाने प्रमुख पाहुण्यांचे स्वागत अभिजात मराठी भाषाने सजवलेला कलश भगिनींनी डोक्यावर घेऊन मराठी पोषाखात केले.

ज्ञात–अज्ञात व्यक्तींनी आत्मीयता दाखवून व काम करून देऊन जिव्हाळा वाढविल्याबाबत आलेले अनुभव ४० लेखक, लेखिकांनी या पुस्तकात लेख स्वरुपात शब्दबध्द केले आहेत. मंडळाद्वारा प्रकाशित होणारे हे २६वे पुस्तक असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष कृष्णनाथ कुळकर्णी यांनी दिली.

मराठी साहित्यात आत्मीयता या विषयावर आतापर्यंत कुणीही असा स्तुत्य उपक्रम केला नाही असे उपस्थित मान्यवरांनी या प्रकाशन प्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास पाटील व पंडित बडगुजर यांनी केले तर आभार अध्यक्ष कृष्णनाथ कुळकर्णी यांनी मानले.

या वेळी पनवेल महापालिकेचे लेखा परिक्षक निलेश नलावडे, समाजिक कार्यकर्ते किरण पाटील, डॉ. वैशाली खोडदे, साहित्यिक, रसिक वाचक, लेखक व लेखिका उपस्थित होते.



क्लिक...क्लिक...!



**पनवेल : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हल्ली शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले जातात. यामध्ये वृक्ष लागवडीचा उपक्रम विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाची जाणीव करून देत असतो.**

# पनवेल सीकेपी हॉलमध्ये रविवारी महिलांसाठी कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला दिनाचे औचित्य साधून ९ मार्च सायंकाळी ६.३० वाजता 'तीच्यापासून तीच्यापर्यंत' या महिलांचे विविध पैलू उलगडणाऱ्या भावपूर्ण काव्यमैफिलीचे श्रीलक्ष्मीनारायण मंदिर पनवेल (सीकेपी हॉल) येथे आयोजन केले आहे. हा कार्यक्रम निःशुल्क असणार आहे.

या वैशिष्ट्यपूर्ण काव्यमैफिलीत दर्जेदार काव्यप्रतिभा लाभलेल्या कवयित्रींचा सहभाग असणार आहे. या महिलांच्या गौरवास्पद काव्यरचना आपणास नक्कीच अंतर्मुख करतील. महिलांनी महिलांच्या गौरवार्थ आयोजित केलेला या कार्यक्रमास स्त्री तत्वाचा अभिमान असणाऱ्या भगिनींना, तसेच माता भगिनी सख्यांचा आपल्या आयुष्यात महत्त्वपूर्ण सहभाग मान्य करणाऱ्या समस्त पुरुष वर्गास आणि विशेषतः काव्यरसिक श्रोत्यांस आग्रहाचे निमंत्रण ईशा पत्की व आशना चौबळ यांनी केले आहे.

तीच्यापासून तीच्यापर्यंत हि कवयित्रींची काव्यमैफिल तर असणार आहेच. पण दमदार आणि उत्कट भावस्पर्शी शब्दांनी स्त्रीयांचं सामाजिक स्थान,त्यांचे विचार, योग्यता तसेच अडचणी, दु:ख, आवेग, ऊद्वेग, यशोगाथा, कष्ट, पुरुषप्रधान समाजाप्रती नुसता रोषच नव्हे तर आदरही, आणि स्वत:च स्वत:चे अस्तित्व ठळकपणे समाजात रुजवण्यासाठीचा कानमंत्र अशा विविध भाव्योक्तीची एक गाथाच आपल्यापुढे साकारली जाणार आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन 'प्रेम..शब्द तसा ओळखीचा' या काव्यमैफिलीतून कौतुकास पात्र ठरलेल्या निवेदिका ईशा व आशना या करणार आहेत.

यांच्या निवेदनातली सहजता आणि विषयाला धरुन प्रत्येक कवितेचा गुंफलेला गोफ आपणास नक्कीच सुखावेल. तसेच रसिक हो प्रस्तुतीतर्फे आपल्या नेहमीच नजरेसमोर असणाऱ्या, स्वबळावर आपापल्या क्षेत्रात यशवंत झालेल्या, कर्तबगार, कर्तुत्ववान तसेच सामाजाप्रती प्रेम जिव्हाळा असणाऱ्या अशा आठ स्त्रीयांना आमंत्रित करून त्यांचा आदरपूर्वक सन्मान करण्याचे योजिले आहे. आपल्या या मायभगिनींच्या या कलाविष्कार आणि सन्मानसोहळ्यास आपण अवश्य हजेरी लाऊन आमचे मनोबल वृद्धींगत करावे.

# ७ एप्रिल रोजी नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महापालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. एप्रिल महिन्याचा लोकशाही दिन ७ एप्रिल २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये २४ मार्च २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

या अर्जात नमूद तक्रार अथवा निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व अथवा अपिल, सेवाविषयक–आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नागरिकांसाठी महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से. १५ ए, किल्लेगांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथे विनामूल्य उपलब्ध असून नवी मुंबई महापालिकेचे संकेतस्थळ (Website) https://nmmconline.in/ यावरील क्विक लिंक्स आयकॉनवरून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते याची नागरिकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# घरफोडी प्रकरणातील अटक आरोपीकडून गुन्ह्याची उकल



**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील काश्मिरे गावात वारंवार घरपोडी चोर्‍या करून अज्ञात चोराकडून हैदोस घालण्यात आला होता. यामुळे गावात भीतीचे वातावरण पसरले होते. काश्मीरे येथे ५ फेब्रुवारी रोजी झालेल्या घरफोडीचा पेण पोलिसांनी आपल्या वरिष्ठ अधिकार्‍यांच्या मार्गदर्शनाखाली सखोल तपास करून अट्टल घरफोडी व चोरी करणारा गुन्हेगार आरोपीत हरिश्चंद्र उर्फ गुड्डू बाळकृष्ण म्हात्रे (वय २७वर्षे रा. काश्मिरे, पो. कांदळेपाडा) याला १४ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली.

पोलिसांनी केलेल्या अधिक तपासात आरोपीकडून एक सोन्याचे गंठण, दोन सोन्याचे हार, एक सोन्याची चैत्र, दोन सोग्याच्या आंगठ्या, एक जोड सोन्याचे झुमके व रोख रक्कम असा एकूण तीन लाख ७४ हजार ३०० रूपये किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास करत असताना पोलिसांना गुड्डूने पेण पोलीस ठाणे हद्दीत चार चोरीचे गुन्हे केले असल्याचे निष्पन्न झाले असून आरोपी याला मोबाईलवर ऑनलाईन रमी नावाचा जुगार खेळण्याची सवय जडल्याने मोहापायी त्याने हे गुन्हे केल्याचे तपासा दरम्यान उघड झाले आहे. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टॉम्पे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांच्या सुचनांनुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी पोसई समद बेग, अंमलदार यांनी तपास करून यश मिळवल्याने सर्व स्तरातून पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.

# खासगी रुग्णालयांच्या मनमानी शुल्क आकारणीला चाप बसणार –ना. आबिटकर

**अलिबाग : प्रतिनिधी**

खासगी रुग्णालयाकंडून रुग्णसेवेसाठी आकारण्यात येणार्‍या मनमानी शुल्क आकारणीला लवकरच चाप बसणार आहे. राज्यात बॉम्बे नर्सिंग अँक्टच्या कठोर अंमलबजावणी सुरू होणार आहे अशी माहिती राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. ते अलिबाग येथे जिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन समारंभानंतर बोलत होते. खासगी रुग्णालयांना दरपत्रक लावणे बंधनकारक करण्यात आले असून, त्यात सुधारणा झाली नाही. तर आरोग्य विभागाकडून पुढील सहा महिन्यात कारवाई केली जाईल, असा इशारा राज्याचे आरोग्य मंत्री



याबाबत होणार्‍या तक्रारींची दखल घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत खासगी रुग्णालयांचे सर्वेक्षण करण्यात आले. यात अनेक त्रृटी दिसून आल्या. या रुग्णालयांना त्या त्रृटी दूर करण्यासाठी आम्ही वेळ दिला आहे. सहा महिन्यात त्यात सुधारणा झाली नाही. तर बॉम्बे नर्सिंग अँक्टमधील तरतूदींनुसार नियमांचे पालन न करणार्‍या रुग्णालयांवर कारवाई केली जाईल असा इशारा आरोग्य मंत्र्यांनी दिला. खाजगी रुग्णालयांनी त्यांच्या रुग्णालयात देण्यात येणार्‍या सेवांबाबत दरपत्रक लावणे बंधनकारक असून पैश्यासाठी रुग्णांची अडवणूक करणे, अवाजवी दर आकारणे योग्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सिटी स्कॅन एमआरआय सुविधांसाठी रुग्णांना चार चार महिने वाट पहावी लागत असल्याच्या तक्रारी आहेत. विधीमंडळाच्या सभागृहातही या प्रश्नाकडे आज लक्ष्यवेधण्यात आले होते. मात्र राज्यातील शासकीय रुग्णालये, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत असलेली रुग्णालये आणि महानगर पालिकांच्या रुग्णालयात सिटी स्कॅन आणि एमआरआय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एक विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. खाजगी सरकारी भागीदारीतून तसेच सरकारच्या माध्यमातून मुंबई सह ग्रामिण भागातील ही आम्ही या सुविधा उपलब्ध करून देणार आहोत. त्यामुळे दोन महिन्यात यात सुधारणा झाल्याचे दिसून येईल, असा विश्वास आरोग्य मंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.

बुलढाण्याच्या केस गळतीबाबत केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून अभ्यास सुरू आहे. त्यांच्या अहवाल आल्यानंतर याबाबत अधिक बोलता येईल, मात्र भविष्यात असे प्रकार होऊ नयेत यासाठी पाऊले उचलली जातील. रायगड जिल्हा रुग्णालयाची इमारत दीड वर्षात पूर्ण होईल. अतिशय देखणी इमारत या ठिकाणी उभारण्यात येणार असून, त्यातून ग्रामिण भागातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा दिल्या जातील असा आशावाद त्यांनी या वेळी व्यक्त केला.

# मध्य रेल्वे ३४ अनारक्षित होळी विशेष ट्रेन चालवणार

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे होळी उत्सवासाठी प्रवास करणार्‍या प्रवाशांच्या सोयीसाठी दादर– रत्नागिरी आणि दौंड – कलबुरगि दरम्यान ३४ अनारक्षित होळी विशेष ट्रेन चालवणार आहे.



मध्य रेल्वेच्यावतीने प्रवासांसाठी होळी निमित्ताने चालवत येणार्‍या विशेष गाड्यांमध्ये दादर – रत्नागिरी अनारक्षित विशेष – त्रि–साप्ताहिक (६ सेवा) गाडी क्रमांक ०११३१ अनारक्षित विशेष गाड्या दि. ११.०३.२०२५ (मंगळवार), १३.०३.२०२५ (गुरुवार) आणि १६.०३.२०२५ (रविवार) रोजी दादर येथून १४.५० वाजता सुटेल आणि रत्नागिरी येथे त्याच दिवशी २३.४० वाजता पोहचेल. (३ सेवा), गाडी क्रमांक ०११३२ अनारक्षित विशेष ट्रेन दि. १२.०३.२०२५ (बुधवार), १४.०३.२०२५ (शुक्रवार) आणि १७.०३.२०२५ (सोमवार) रोजी रत्नागिरी येथून ०४.३० वाजता सुटेल आणि दादर येथे त्याच दिवशी १३.२५ वाजता पोहोचेल. (३ सेवा), या गाडयांसाठी ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, अरवली रोड आणि संगमेश्वर हे थांबे देण्यात आले आहेत.

दौंड–कलबुरगि अनारक्षित विशेष–आठवड्यातून पाच दिवस (२० सेवा) गाडी क्रमांक ०१४२१ अनारक्षित विशेष ट्रेन दि.१०.०३.२०२५ ते २२.०३.२०२५ पर्यंत दौंड येथून ०५.०० वाजता सुटेल (१३.०३.२०२५, १६.०३.२०२५ आणि २०.०३.२०२५ वगळता) आणि कलबुरगि येथे त्याच दिवशी ११.२० वाजता पोहचेल. (१० सेवा), गाडी क्रमांक ०१४२२ अनारक्षित विशेष ट्रेन दि. १०.०३.२०२५ ते २२.०३.२०२५ पर्यंत (१३.०३.२०२५, १६.०३.२०२५ आणि २०.०३.२०२५ वगळता) कलबुरगि येथून १६.१० वाजता सुटेल आणि दौंड येथे त्याच दिवशी २२.२० वाजता पोहोचेल. (१० सेवा) या गाडीला भिगवण, पारेवाडी, जेऊर, केम, कुर्डूवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, टिकेकरवाडी, होटगी, अकलकोट रोड, बोरोटी, दुधनी आणि गाणगापूर हे थांबे देण्यात आले आहे.

दौंड–कलबुरगि अनारक्षित विशेष – द्वि–साप्ताहिक (८ सेवा) गाडी क्रमांक ०१४२५ अनारक्षित विशेष ट्रेन दि. ०९.०३.२०२५, १३.०३.२०२५, १६.०३.३०२५ आणि २०.०३.२०२५ (गुरुवार आणि रविवार) रोजी दौंड येथून सकाळी ५.०० वाजता सुटेल आणि कलबुरगि येथे त्याच दिवशी ११.२० वाजता पोहोचेल. (४ सेवा), गाडी क्रमांक ०१४२६ अनारक्षित विशेष ट्रेन दि. ०९.०३.२०२५, १३.०३.२०२५, १६.०३.३०२५ आणि २०.०३.२०२५ (गुरुवार आणि रविवार) रोजी कलबुरगि येथून २०.३० वाजता सुटेल आणि दौंड येथे दुसर्‍या दिवशी ०२.३० वाजता पोहचेल. (४ सेवा), या गाडीला भिगवण, पारेवाडी, जेउर, केम, कुर्डूवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, टिकेकरवाडी, होटगी, अकलकोट रोड, बोरोटी, दुधनी आणि गाणगापूर हे थांबे देण्यात आले आहेत.

या गाडीसाठी सामान्य शुल्कासह अनारक्षित विशेष गाड्यांसाठी तिकिटे यूटीएस द्वारे बुक करता येतील.या विशेष गाड्यांच्या वेळा आणि थांब्यांसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा, असे आवाहन मध्य रेल्वेच्या वतीने करण्यात आले आहे.

# माजी प्राध्यापकाची पेणमध्ये आत्महत्या

**पेण, अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील जेएसएम महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक व जन शिक्षण संस्थान रायगडचे माजी अध्यक्ष अविनाश ओक यांनी बुधवारी पेण रेल्वे स्टेशन येथे दुपारी दोनच्या सुमारास धावत्या रेल्वेसमोर उडी मारून आत्महत्या केली ते ६५ वर्षांचे होते. भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या हे प्राध्यापक अविनाश ओक यांचे चुलत मेव्हणे लागत असून या घटनेनंतर सोमय्या हे पेणमध्ये दाखल झाले होते.



प्रा. अविनाश ओके हे मूळ माणगाव येथे राहणारे असून त्यांचे वडील प्रसिद्ध अँड (आबा) मनोहर ओक होते. प्रा.अविनाश ओक अलिबाग येथे कामानिमित्ताने स्थायिक झाले. अलिबाग येथील जेएसएम कॉलेज येथे राज्यशास्त्र या विषयाचे ते प्राध्यापक होते. याच दरम्यान त्यांनी जनशिक्षण संस्था रायगड अध्यक्षपदी भूषविले आहे.

तर त्यांच्या पत्नी अलिबाग येथील कमळ नागरी संस्थेच्या संचालिका आहेत. त्यांनी स्वतःची गाडी पेण रेल्वे स्टेशनच्या समोर दुपारी दोनच्या सुमारास उभी करून येणार्‍या रेल्वे समोर उडी मारून आत्महत्या केल्याचे समजून येत आहे. अविनाश ओक यांचे मूळ गाव तालुका माणगाव येथील असले तरी सध्या ते अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथे कुटुंबियासह राहत होते. बुधवारी या घटनेचा वृत्त समजताच माजी खासदार किरीट सोमय्या हे उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाले होते व त्यांनी पेण पोलिसांकडून घटनेची माहिती घेतली. यानंतर अविनाश ओक यांचे मृतदेह अलिबाग येथील राहत्या घरी रात्री उशिरा पाठवण्यात आला. रात्री अंत्यसंस्कारही करण्यात आले.

प्राध्यापक अविनाश ओक यांच्या आत्महत्येची चिठ्ठी घटनास्थळी पोलिसांना त्यांच्या शर्टच्या खिशात सापडली आहे. या चिठ्ठीत 'मी आत्महत्या करत आहे, मृत्यूस कोणासही जबाबदार धरू नये अशा प्रकारचा मजकूर या चिठ्ठीत लिहिलेला आहे. ओक यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगा, सून, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

# निसर्ग शिक्षणात यशवंतनगर हायस्कूलला पारितोषिक

**मुरूड : प्रतिनिधी**

ग्रीन वर्क्स ट्रस्ट व एस. बी. आय.फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूड तालुक्यातील यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयामध्ये सस्टेनेबल फणसाड या प्रकलपांतर्गत इकोब्रीज हा उपक्रम निसर्ग शिक्षण या विषयावर राबवण्यात आला.



या उपक्रमात शाळेने उस्फुर्त सहभाग नोंदवल्याबद्द, ग्रीन वर्क ट्रस्टच्या नेचर एज्युकेशनच्या प्रोजेक्ट मॅनेजर शिवानी पुजारी यांच्या हस्ते मुख्याध्यापिका अर्चना खोत यांना एका कार्यक्रमात शाळेसाठी विशेष पारितोषिक प्रदान करण्यात आले. तसेच या उपक्रमातील सहभागी विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्रांचे वाटप उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात करण्यात आले.

या वेळी सहजीवन विद्यामंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे, विद्यालयाचे पर्यवेक्षक प्रतिक पेडणेकर, राहील घलटे, विद्यालयातील शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, शिक्षक रविंद्र ढोले, दत्तात्रय खुळपे, सागर राऊत, सिध्दार्थ काकनाटे, शिक्षिका राजश्री घाडगे, भारती बांद्रे आदींसह शाळेतील अन्य शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धोंडपाडा येथे तुकाराम बीजनिमित्त हरिनाम सप्ताह

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील धोडपाडा तालुका पेण येथे संत तुकाराम महाराज बिजोत्सवाचे ११९ वे वर्ष साजरे होत असून यानिमित्ताने फाल्गुन शुद्ध ११ सोमवार १० मार्च ते १७ मार्च अखेर अखंड हरीनाम व कीर्तन ज्ञानेशरी पारायण, हरिपाठ, सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सोमवार १० मार्च रोजी दिलीप महाराज पाटील ओढांगी यांचे प्रवचन तर रात्री लक्ष्मण महाराज देवकर आळंदी यांचे कीर्तन होईल. मंगळवार ११ मार्च रोजी संदीप महाराज भोईर पिंपळपाडा यांचे प्रवचन तर रात्री छगन महाराज खडके संगमनेर यांचे कीर्तन होईल. बुधवार १२ मार्च रोजी चंदन महाराज पाटील रावे यांचे प्रवचन रात्री आदिनाथ महाराज लाड आळंदी यांचे कीर्तन होईल. गुरुवार १३ मार्च रोजी महादेव महाराज उखालिकर परळी वेजनाथ यांचे प्रवचन तर रात्री आझाद महाराज गुजर सातारा यांचे कीर्तन होईल.

शुक्रवार १४ मार्च रोजी अक्षय महाराज भगत चरी यांचे प्रवचन तर रात्री अंकुश महाराज कदम सातारा यांचे कीर्तन होईल. शनिवार १५ मार्च रोजी ज्ञानेश्वर महाराज पाटील वढखळ यांचे प्रवचन तर रात्री केशव महाराज घुले बीड यांचे कीर्तन होईल. यानंतर रविवार १६ मार्च रोजी पहाटे साडेचार वाजता गीता पारायण, सकाळी वेकुंठ गमन कीर्तन केशव महाराज घुले बीड यांचे होईल.

यानंतर दुपारी महाप्रसाद होईल. याच दिवशी रात्री श्री ची पालखी व मिरवणूक काढण्यात येईल. सोमवार १७ मार्च रोजीसकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत कल्याचे कीर्तन होसाराम महाराज मगर (देगावाट) यांचे होईल. या बिजोस्तव व सप्ताहाचे आयोजन धोंडपाडा ग्रामस्थ व पंचक्रोशी ग्रामस्थ मंडळ यांनी केले आहे.

# देविदास म्हात्रे यांना निबंध स्पर्धेत पारितोषिक



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वढाव येथील निवृत्त प्राथमिक शिक्षक देविदास गणपत म्हात्रे यांना नेताजी पालकर मंडळ चौक खालापूर येथील उंबरखिंड विजयदिन निमित्ताने शिवशाहीतील ऐतिहासिक स्थळ चौक व उंबरखिंड आणि त्या परीसरातील महत्व त्या विषयावरील जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला आहे.

प्रथम क्रमांक शुभांगी नंदकुमार साखरे तर द्वितीय क्रमांक सुहासिनी सुनिल पवार यांना मिळाला आहे. स्पर्धेचे परीक्षक इतिहास अभ्यासक प्राध्यापक अशोक मोरे सर शिरवली खालापूर हे होते. देविदास म्हात्रे हे निवृत्त प्राथमिक शिक्षक असून त्यांना जिल्हास्तरावरील निबंध स्पर्धेत एकूण आठ पारीतोषिके मिळाली आहेत. या मंडळाने दरवर्षी या स्पर्धा आयोजित करून आम्हाला संधी दिल्याबद्दल आयोजकांचे देविदास म्हात्रे यांनी धन्यवाद मानले.

# कारखानदारीत सुरक्षा सप्ताहाला प्रारंभ / औद्योगिक सुरक्षेचा होणार जागर



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली–खालापूरमधील सर्वच कारखान्यात मंगळवारी ०४ मार्च राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त सुरक्षा दिवस साजरा करण्यात आला. ४ ते १० मार्च राष्ट्रीय औद्योगिक सुरक्षा सप्ताह येथील कारखानदारित सुरक्षा विशेयक विविध कार्यक्रमांनी साजरा केला जात आहे. संपूर्ण सप्ताहात सुरक्षेचा जागर करून, औद्योगिक सुरक्षा व आरोग्याबाबत जनजागृती केली जाणार आहे.

यात औद्योगिक क्षेत्रातील कामगार कर्मचार्‍यांची कार्यस्थळ वरील सुरक्षा, त्यांचे आरोग्य व पर्यावरण बाबत विविध माध्यमातून जनजागृती केली जाणार आहे. यात सामूहिक सुरक्षा शपथ, सुरक्षा रैली, निबंध, चित्रकला, घोषवाक्य, ड्रिल, फायर फायटिंग स्पर्धेसह औद्योगिक सुरक्षा प्रदर्शने होणार आहेत. संपूर्ण सप्ताहात असे नानाविध कार्यक्रम आयोजित करण्यात आली असून यानिमित्ताने यशस्वी कामगारांचे कौतुक सोहळे ही होणार आहेत.

यासाठी रायगड जिल्हा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचलनालय, नॅशनल सेफ्टी कौन्सिल, स्थानिक प्रशासन, अग्निशमन दल, पोलीस अधिकारी व औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत.

होणाड–खोपोली येथील प्रसोल केमिकल्स लि.कंपनीत ४ मार्च रोजी मोठ्या दिमाखात सुरक्षा दिन साजरा करण्यात आला. ४ ते ११ मार्च अशा पूर्ण सप्ताहात या कंपनीत सुरक्षा बाबत जनजागृती, कामगार प्रशिक्षण, विविध स्पर्धा व अन्य कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. यासाठी कंपनीचे मुख्य व्यवस्थापक विलास पाटील, कंपनी व्यवस्थापक अनिल पाटील, सचिन प्रभू, संदीप खोपकर, दत्ता देशमुख, योगेश पाटील व अन्य अधिकारी सक्रिय आहेत.

# विभा चोरगे यांचा सन्मान

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा येथे योग प्रशिक्षक म्हणून प्रसिद्ध असलेल्या योगा ट्रेनर विभा वेभव चोरगे यांचा जागतिक महिला दिनानिमित्ताने महाराष्ट्र जर्नालिस्ट फाउंडेशन यांच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श नवदुर्ग सन्मान ने २ मार्च रोजी कोल्हापूर येथे सन्मानित करण्यात आले.

रोहा तालुक्यातील पडम नाका येथील विभा वैभव चोरगे या रोहा शहर व परिसरातील महिलांना गेली अनेक वर्ष योगाचे प्रशिक्षण देत आहेत. या योग प्रशिक्षणाचा महिलांना फायदा झाला आहे. या योग प्रशिक्षणाच्या कामाची दखल घेत विभा वैभव चोरगे यांना सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या निवासस्थानी जाऊन सर्व स्तरातील प्रतिष्ठित नागरिकांनी त्यांचा सत्कार केला आहे.



# भारत-न्यूझीलंड फायनलमध्ये भिडणार

## चॅम्पियन्स ट्रॉफीत दक्षिण आफ्रिकेचा पराभव; पुन्हा स्वप्न भंगले

**लाहोर : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या उपांत्य फेरीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा धावांनी दारूण पराभव करत अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. आता चॅम्पियन्स ट्रॉफीचा अंतिम सामना भारत वि. न्यूझीलंड या संघांमध्ये होणार आहे.

न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील विक्रमी धावसंख्या उभारत दक्षिण आफ्रिकेच्या संघाला ३६३ धावांचे महाकाय आव्हान दिले होते, पण सातत्याने विकेट्स गमावल्याने आफ्रिकेचा संघ मागे राहिला आणि ३१२ धावाच करू शकला. दक्षिण आफ्रिकेकडून डेव्हिड मिलरने अखेरच्या चेंडूवर शतक पूर्ण करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

न्यूझीलंड संघाने दिलेल्या ३६३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेचा उत्कृष्ट लयीत असलेला रायन रिकल्टन १७ धावा करत बाद झाला. कर्णधार टेम्बा बावुमा आणि रॅसी व्हॅन डेर




ड्युसेन यांनी चांगली भागीदारी रचली, पण संघाला विजयापर्यंत नेऊ शकले नाही. बावुमाने ७१ चेंडूत एक षटकार आणि चार चौकारांसह ५६ धावा, तर ड्युसेनने ६६ चेंडूत दोन षटकार आणि चार चौकारांसह ६९ धावा केल्या. आफ्रिकेला सर्वात मोठा धक्का बसला तो म्हणजे क्लासेनच्या रूपात. क्लासेन




३१ धावा करत बाद झाला. तो चांगल्या लयीत होता, पण मोठी खेळी करू शकला नाही.

मिलर वगळता आफ्रिकेच्या खालच्या फळीतील कोणालाच मोठी कामगिरी करता आली नाही. मिलरने अखेरच्या चेंडूवर आपले शतक पूर्ण केले. त्याने अवघ्या ६७ चेंडूत १० चौकार व चार षटकारांसह शतक ठोकले.

न्यूझीलंड संघाच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत संघाला विकेट मिळवून दिल्या. कर्णधार मिचेल सँटनरने सर्वाधिक तीन, मॅट हेन्री आणि ग्लेन फिलीप्सने प्रत्येकी दोन, तर मायकेल ब्रेसवेल आणि रचिन रवींद्र यांनी एक विकेट घेतली.

न्यूझीलंड संघाने या सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या ३६२ उभारली. न्यूझीलंडकडून रचिन रवींद्र (१०८ धावा) आणि केन विल्यमसन (१०२ धावा) यांनी शतके ठोकून मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. यानंतर डॅरिल मिचेल आणि ग्लेन फिलीप्स यांनी वादळी फलंदाजी करत ४९-४९ धावांची खेळी केली.

# पॅरा पॉवरलिफ्टिंग स्पर्धेमध्ये विक्रमसिंह राठोड यांना 'सुवर्ण'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पुणे येथे झालेल्या तिसऱ्या राज्यस्तरीय पॅरा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये ७२ किलो वजन गटात १५७.५० किलो वजन उचलून विक्रमसिंह राठोड (नेरूळ, नवी मुंबई) यांनी सुवर्णपदक जिंकले.

शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त असलेले विक्रमसिंह राठोड यांची १६ ते १८ मार्चदरम्यान उत्तर प्रदेशातील नोएडा येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॅरा पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये आणि २० ते २७ मार्चदरम्यान नवी दिल्ली येथे होणाऱ्या खेलो इंडिया पॅरा गेम्सच्या दुसऱ्या आवृत्तीत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे.




विक्रमसिंह राठोड यांना गुरुवर्य राकेश पाटील, यांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले आहे. वल्कन हेल्थ क्लब, नेरूळ येथे नियमित सराव करणाऱ्या या जिद्दी खेळाडूला क्लबचे क्रीडाप्रेमी मालक व संचालक दयानंद भगत आणि सर्व खेळाडू सहकाऱ्यांनी नेहमीच पाठिंबा व प्रोत्साहन दिले आहे. याबद्दल राठोड यांनी सर्वांचे आभार मानले असून पुढील राष्ट्रीय स्पर्धात पदक मिळवण्याचा निर्धार केला आहे.

राठोड यांनी सिडनी पॅरा ऑलम्पिक गेम्स सन २०००मध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्यांना नवी मुंबई भूषण पुरस्कार आणि महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार मिळाला आहे. ते आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू (दोन्ही पायांनी अधू) असून आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये कांस्यपदकाचे मानकरी आहेत.

# सुकापूर येथील सरपंच चषक स्पर्धेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापूर ग्रामस्थ मंडळातर्फे सुकापूर प्रीमियर लीग या सरपंच चषक २०२५ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन ६ ते ९ मार्चदरम्यान करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी झाले.

उद्घाटन समारंभास भाजपचे तालुका चिटणीस यतीन पाटील, जनार्दन पाटील, सरपंच योगिता पाटील, उपसरपंच दिवेश भगत, माजी उपसरपंच अशोक पाटील आळूराम केणी, हनुमंत खुटले, ग्रामपंचायत सदस्य प्राची जाधव, चंद्रकांत पोपेटा, अनिता पााटील, पुष्पा म्हस्कर, आत्माराम पाटील, आयोजक महेश पाटील, डॉ. कृष्णा देसाई, पाली देवद सरचिटणीस उदय म्हस्कर, अनिल पोपेटा, शशिकांत पाटील, कृष्णा म्हात्रे, चांगदेव ठाकूर, बाळकृष्ण पाटील, संजय म्हात्रे, अनंता पाटील, भरत म्हस्कर,



राजेंद्र चव्हाण, प्रफुल्ल मोटे, संजय पाटील, विवेक पोपेटा, गुरूनाथ पाटील यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

या वेळी अरुणशेठ भगत यांनी मैदानात जाऊन फटकेबाजी करीत खेळाचा आनंद लुटला.



## सीकेटी महाविद्यालय येथे आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धा

# रूपारेल, गुरूनानक खालसा कॉलेज प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे मुंबई विद्यापीठ यांच्या समन्वयाने आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल स्पर्धेचे आयोजन ५ व ६ मार्च रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेस प्रतिसाद लाभला.

स्पर्धेत एकूण १० महाविद्यालयातील मुलींच्या चार संघांनी व मुलांच्या सहा संघांनी सहभाग नोंदविला. मुलींमध्ये प्रथम क्रमांक डी.जी. रूपारेल महाविद्यालय माटुंगा, द्वितीय सीकेटी कॉलेज, तृतीय आर. ए. पोतदार महाविद्यालय




माटुंगा आणि चतुर्थ क्रमांक विवेकानंद महाविद्यालय चेंबूर यांनी पटकाविला.

मुलांमध्ये प्रथम क्रमांक गुरूनानक खालसा महाविद्यालय माटुंगा, द्वितीय विवेकानंद महाविद्यालय चेंबूर, तृतीय डी.जी. रूपारेल महाविद्यालय माटुंगा आणि चतुर्थ क्रमांक पिल्लई कॉलेज नवीन पनवेल यांनी पटकाविला.

सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी विजेत्या संघांना पारितोषिके देऊन गौरव केला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना विभागाचे चेअरमन डॉ. व्ही.बी. नाईक, सहसंचालक प्रा. अनिल नाक्ती, प्रा. प्रतिज्ञा पाटील तसेच सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. दरम्यान, विजेत्या संघांचे अभिनंदन होत आहे.

# गोलंदाजी क्रमवारीत वरुण चक्रवर्तीची मुसंडी

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने ५ मार्च रोजी ताजी एकदिवसीय क्रमवारी जाहीर केली असून यामध्ये भारतीय खेळाडूंचे वर्चस्व स्पष्टपणे दिसून आले. गोलंदाजी क्रमवारीत मोहम्मद शमीच्या रँकिंगवर सर्वांच्या नजरा खिळल्या असताना वरुण चक्रवर्तीने सर्वात मोठी कामगिरी दाखवण्यात यश मिळवले.

चक्रवर्तीला आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आतापर्यंत फक्त दोन सामने खेळण्याची संधी मिळाली, ज्यामध्ये त्याने एकूण सात विकेट घेतल्या आहेत. यापैकी न्यूझीलंडविरुद्धच्या गट फेरीतील सामन्यात त्याने पाच, तर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात दोन विकेट्स घेतल्या.

आयसीसीच्या ताज्या एकदिवसीय क्रमवारीत वरुण चक्रवर्तीने एकूण १४३ स्थानांनी झेप घेतली आहे, ज्यामुळे तो आता अव्वल १०० गोलंदाजांमध्ये




पोहचला आहे. चक्रवर्ती एकूण ३७१ रेटिंग गुणांसह क्रमवारीत ९६व्या स्थानावर आहे. त्याच्याव्यतिरिक्त मोहम्मद शमीनेही आयसीसीच्या गोलंदाजांच्या क्रमवारीत तीन स्थानांनी झेप घेतली आहे, ज्यामध्ये तो आता ६०९ रेटिंग गुणांसह ११व्या क्रमांकावर पोहचला आहे. अक्षर पटेलने सात स्थानांनी झेप घेतली आहे आणि तो ४९९ रेटिंग गुणांसह ४०व्या स्थानावर पोहचला आहे.

दरम्यान, भारतीय संघाचा फिरकी गोलंदाज कुलदीप यादव आतापर्यंत आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये त्याच्या गोलंदाजीने अपेक्षित प्रभाव पाडू शकलेला नाही. गोलंदाजांच्या ताज्या क्रमवारीत त्याला तीन स्थानांचा तोटा झाला आहे. त्यामुळे तो आता ६३७ रेटिंग गुणांसह सहाव्या स्थानावर घसरला आहे.

# प्रकाश ठोंबरेंनी टाटा अल्ट्रा मॅरेथॉन केली पूर्ण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील कळंबजवळील पोही गावचे प्रकाश ठोंबरे यांनी लोणावळा येथे अत्यंत खडतर समजली जाणारी टाटा अल्ट्रा मॅरेथॉन पूर्ण केली आहे. ते ४३ वर्षांचे आहेत.



प्रकाश ठोंबरे वयाच्या १५ वर्षांपासून वेगवेगळ्या अंतराच्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभाग घेत असून नुकतेच त्यांनी लोणावळा येथे ५० किमी लांबीची मॅरेथॉन यशस्वीपणे पूर्ण केली. ही स्पर्धा लोणावळा शहराच्या आजूबाजूच्या डोंगरातून असल्याने ती खडतर समजली जात होती. ठोंबरे यांनी सहा तास २१ मिनिटे ४५ सेकंदात स्पर्धा पूर्ण केली. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.






# आणखी एका खेळाडूची वनडेमधून निवृत्ती

## बांगलादेशच्या मुशफिकुर रहीमचा अलविदा!

**ढाका : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या गट टप्प्यातूनच एकही सामना न जिंकता बाहेर पडलेला संघ बांगलादेश संघातील यष्टिरक्षक-फलंदाज मुशफिकुर रहीम याने एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली.

३७ वर्षीय मुशफिकुरने २४ फेब्रुवारीला न्यूझीलंडविरुद्ध चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये या फॉरमॅटमधील शेवटचा सामना खेळला होता. २७ फेब्रुवारीला खरंतर तो अखेरचा पाकिस्तानविरुद्ध सामना खेळणार होता, मात्र पावसामुळे सामना रद्द करावा लागला. मुशफिकुरने २००६मध्ये झिम्बाब्वेविरुद्ध हरारे येथे वनडे क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते.

मुशफिकुर रहीमने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत निवृत्ती जाहीर केली आहे. पोस्टमध्ये त्याने लिहिले की, मी आजपासून एकदिवसीय



क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करीत आहे. सर्व गोष्टींसाठी देवाचे आभार. जागतिक स्तरावर आमची कामगिरी मर्यादित असली तरी एक गोष्ट निश्चित आहे की, मी जेव्हा जेव्हा माझ्या देशासाठी मैदानात उतरलो तेव्हा समर्पणाने आणि प्रामाणिकपणाने खेळलो आणि १०० टक्क्यांहून जास्त देण्याचा प्रयत्न केला.

तो पुढे म्हणाला, गेले काही आठवडे माझ्यासाठी खूप आव्हानात्मक होते आणि मला जाणवले की हे माझे नशीब आहे. शेवटी, मी माझे कुटुंब, मित्र आणि चाहत्यांचे मनापासून आभार मानू इच्छितो, ज्यांच्यासाठी मी १९ वर्षे क्रिकेट खेळलो.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५मध्ये बांगलादेशची कामगिरी काही खास नव्हती. एकही सामना न जिंकता संघ गट टप्प्यातून बाहेर पडला. बांगलादेशने भारताविरुद्धच्या सामन्यासह मोहिमेला सुरुवात केली, ज्यामध्ये त्यांचा सहा विकेट्सने पराभव झाला. या सामन्यात मुशफिकुर गोल्डन डकवर बाद झाला, तर न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या सामन्यात त्याला केवळ दोन धावा करता आल्या. गट टप्प्यातील शेवटच्या सामन्यात बांगलादेशचा सामना पाकिस्तानशी होणार होता, मात्र पावसामुळे सामना रद्द झाला.

# रचिन रवींद्रचा शतकासह पराक्रम

**लाहोर : वृत्तसंस्था**

आयसीसी टूर्नामेंट आणि रचिन रवींद्रचे शतक यांचे जणू समीकरणचे झाले आहे. न्यूझीलंडच्या या डावखुऱ्या फलंदाजाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत शानदार शतक झळकावले. त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १०८ धावांची उत्कृष्ट खेळी केली. या शतकासह रचिनने विश्वविक्रम आपल्या नावावर केला.

रचिनने १०१ चेंडूत १३ चौकार आणि एका षटकारासह १०८ धावांची शानदार खेळी केली. त्याचे वनडेतील हे पाचवे शतक. ही सर्व शतके त्याने आयसीसी स्पर्धेत केली आहेत. विशेष म्हणजे त्याने हा पराक्रम सर्वात कमी १३ डावात केला आहे. याबाबतीत त्याने भारताच्या शिखर धवनला मागे टाकले. धवनने १५ डावांमध्ये ही कामगिरी केली होती. मोठी गोष्ट म्हणजे रचिनच्या एकदिवसीय कारकिर्दीत केवळ पाच शतके आहेत आणि ती सर्व त्याने विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये झळकावली आहेत. २०२३च्या विश्वचषक स्पर्धेत त्याने तीन शतके केली होती आणि आता चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये दोन शतके ठोकली आहेत.




सौजन्य : राजश्री वावेकर (अध्यक्ष, पनवेल शहर महिला मोर्चा)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com